# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | सोमवार । दि. १५ जून २०२६ । अंक ९ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## चौक-कर्जत मार्गावर अपघात

**रसायनी :** चौक-कर्जत रस्त्यावर बोरगाव जवळ दोन मोटरसायकलस्वारांचा अपघात झाला असून दोन्ही तरुणांचा मृत्यू झाला आहे. चौक ग्रामीण रुग्णालयामध्ये दोन्ही मृतदेह वैद्यकीय तपासणी करण्यासाठी दाखल केले आहेत. सिद्धार्थ जाधव हा चौक दिशेकडून कर्जतकडे जात होता,तर सुजित बोराडे भिसेगांव येथून चौक दिशेला येताना बोरगाव हद्दीत दोन्ही मोटारसायकल समोरासमोर आल्याने एकमेकांना जोरदार धडक दिल्याने दोघांचा मृत्यू झाला असावा असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मध्यरात्री एक वाजण्याच्या पान २ वर

## शाळांमध्ये आजपासून किलबिलाट

**अलिबाग:** गेले दोन महिने शांत असणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सोमवार (दि.१५) पासून पुन्हा एकदा विद्यार्थ्यांचा किलबिलाट सुरू होणार आहे. बालकांना शाळेची आवड निर्माण व्हावी व त्यांची उपस्थिती वाढावी, याकरीता रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून नवनवीन उपक्रम राबविले जाणार आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या वाढावी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी सोमवारी (दि. १५) राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पनवेल तालुक्यातील पान २ वर

# सांबरकुंडाचे पाणी पेटणार

## शेतकऱ्यांच्या मागण्या अजूनही कागदावरच; कंत्राटदार पोहोचला शेताच्या बांधावर

**सुयोग आंग्रे**
**। रायगड ।**

शासनाचा महत्त्वाकांक्षीआणि बहुप्रतीक्षित असणारा सांबरकुंड माध्यम प्रकल्पाचे पाणी साठण्याऐवजी पेटण्याची चिन्हे आहेत. सांबरकुंड माध्यम प्रकल्पाला विकासाचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून देशाचे सुजाण नागरिक असणाऱ्या शेतकऱ्यांनी दाखवलेली सकारात्मकता आता पश्चाताप करण्याची वेळ आणणारी ठरली आहे.

धरण होणार आणि तालुक्याचा पाण्याचा प्रश्न मिटणार म्हणून एकीकडे अलिबाग तालुक्यातील नागरिक आनंदात आहेत. तर दुसरीकडे शेतकरी देशोधडीला लागणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. अद्याप शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सुपीक जमिनीच्या भूसंपादनाचा मोबदला दिला नसताना कंत्राटदाराने सांबरकुंडाच्या जमिनीवर



पावले रोवण्यास सुरुवात केली आहे. शासनाने नेमलेला कंत्राटदार आपल्या बांधकाम यंत्रणेसह धरण क्षेत्रात दाखल झाला असून शेतकऱ्यांवर शासनाची 'महालक्ष्मी' अद्याप प्रसन्न झालेली नाही. यामुळे सांबरकुंड प्रकल्प बाधित शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. आधी आमच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करावी नंतरच धरणाच्या कामाला सुरुवात करा, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा प्रकल्प बाधितांनी पान २ वर

### एकजुटीचा निर्धार

शासन शेतकऱ्यांना गृहीत धरून आपली कारवाई कूर्मगतीने करीत आहे. आता प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने वरिष्ठ पातळीवर हालचाली सुरु झाल्या आहेत. ज्या गावांचे पुनर्वसन केले जाणार आहे, त्या गावांच्या पुनर्वसनासाठी शासनाने जागा उपलब्ध करून दिली आहे. परंतु त्या जागेला आता बाधितांकडून विरोध केला जात आहे. आधी पुनर्वसन मग धरण असा कायदा आहे. त्याला बगल देत कंत्राटदाराची यंत्रणा सांबरकुंड प्रकल्प क्षेत्रात येऊन ठेपल्याने आता शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. आता शेतकऱ्यांसमोर बाका प्रसंग ओढवला आहे. या प्रसंगावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी एकजुटीने लढा उभारण्याचा निर्धार केला आहे.

# रहिवासी भूभागावर औद्योगिक शिक्का

- जेएनपीएच्या निर्णयाविरोधात ग्रामस्थ आक्रमक
- गावांवरील ताण वाढण्याची शक्यता

**। उरण । प्रतिनिधी ।**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) उरण तालुक्यातील फुंडे, जासई, जसखार आणि सावरखार येथील तब्बल १२२.१ हेक्टर जमिनीच्या भू-वापरामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव मांडला असून या निर्णयाला स्थानिक नागरिकांकडून तीव्र विरोध होत आहे. रहिवासी व वाणिज्य वापरासाठी आरक्षित असलेल्या काही भूखंडांचा वापर औद्योगिक तसेच सार्वजनिक-निमसार्वजनिक स्वरूपात बदलण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

यासंदर्भातील अधिसूचना ६ जून रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून नागरिकांना हरकती व सूचना नोंदविण्यासाठी २० जून २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. मात्र या प्रस्तावाची पुरेशी माहिती स्थानिक नागरिकांपर्यंत पोहोचलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

स्थानिकांच्या मते, प्रस्तावित भू-वापर बदलामुळे गावांच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक विकासाला चालना मिळणार असून त्यामुळे प्रदूषण, वाहतूक कोंडी, पर्यावरणीय ऱ्हास आणि आरोग्यविषयक गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. रहिवासी क्षेत्रांच्या लगत औद्योगिक वापराला परवानगी दिल्यास गावांवरील ताण आणखी वाढेल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

ग्रामस्थांनी असा आरोप केला आहे की, इतक्या महत्त्वाच्या निर्णयाबाबत व्यापक जनजागृती किंवा जनसुनावणी न पान २ वर

## वेधक

### एसटी बसच्या चाकाला चिरा

**पेण :** पेण शहरातून प्रवास करणाऱ्या अलिबाग डेपोतील एसटी बसच्या मागील चाकाला मोठ्या प्रमाणात चिरा गेल्याचे निदर्शनास आले आहे. धावत्या बसच्या चाकाची अशी अवस्था पाहून प्रवासी व नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. बसच्या मागील चाकावर स्पष्टपणे चिरा दिसत असून, अशा अवस्थेत बस रस्त्यावर धावत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः एसटी बसमधून शेकडो प्रवासी प्रवास करत असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी बसच्या चाकासह इतर यांत्रिक बाबींची पान २ वर

### पिरवाडी किनाऱ्यावर जीव धोक्यात


**उरण :** तालुक्यातील नागाव समुद्रकिनारा हा पर्यटनासाठी प्रसिद्ध होत असला तरी पिरवाडी परिसरातील धोकादायक टापूमुळे पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. भरती-ओहोटीचा अंदाज न आल्याने वारंवार पर्यटक टापूवर अडकत असून त्यांना वाचवण्यासाठी स्थानिक नागरिक आणि जीवरक्षकांना स्वतःचा जीव धोक्यात घालून समुद्रात उतरावे लागत आहे. शनिवारी मुंबईहून फिरण्यासाठी आलेले एक जोडपे भरतीच्या पाण्याचा अंदाज न आल्याने पिरवाडी दर्ग्यालगतच्या टापूवर अडकले होते. परिस्थिती गंभीर होताच सुरक्षा रक्षक आणि स्थानिक नागरिकांनी पान २ वर

### एसटीच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी

**पोलादपूर :** तालुक्यातील चरई-सोनारवाडी परिसरातील अवघड वळणावर एसटी बसची मोटारसायकलला धडक बसून झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला. रविवारी (दि.१४) दुपारी झालेल्या या अपघातामुळे एसटी चालकाबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आल्याने तणाव निर्माण झाला. बोरावळे पोलादपूर मार्गावरील एसटी बस चालक दत्तात्रेय दराडे हे बस पोलादपूरच्या दिशेने घेऊन परत येत होते. चरई बाजूकडून घागरकोंड पान २ वर

## जेएनपीएच्या जेएसडब्ल्यू जेट्टीवर दोघांचा मृत्यू

- पिगिंग प्रक्रियेदरम्यान स्फोट
- औद्योगिक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर




**। उरण । प्रतिनिधी ।**

जेएनपीए बंदरातील जेएसडब्ल्यूच्या लिक्विड जेट्टीवर रविवारी सकाळी झालेल्या भीषण दुर्घटनेत दोन कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाल्याने उरण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. तेलवाहिनी स्वच्छ करण्याच्या पिगिंग प्रक्रियेदरम्यान झालेल्या या दुर्घटनेमुळे बंदर परिसरात एकच खळबळ उडाली असून सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जेएनपीटी बंदरात लागलेल्या ऑईल जहाजातील माल खाली केल्यानंतर तेलवाहिनी स्वच्छ करण्याचे काम सुरू होते. रविवारी सकाळी सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास पिगिंग प्रक्रियेदरम्यान अचानक पाईपलाईनमध्ये पान २ वर

## आपटा स्मशानभूमीत अघोरी विद्येचा थरार!



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनीतील आपटा गावाच्या हद्दीत नदीकिनारी असलेल्या स्मशानभूमीत अज्ञाताकडून अघोरी (जादूटोणा) प्रकार करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. या भयानक प्रकारामुळे संपूर्ण आपटा गावात आणि पंचक्रोशीत एकच खळबळ उडाली असून, स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आपटा नदीकिनारी असलेल्या स्मशानभूमीत काही नागरिक गेले असता त्यांना हा धक्कादायक प्रकार दिसून आला. स्मशानभूमीत ज्या शेडखाली मृतदेहांवर अंत्यसंस्कार पान २ वर

## महापालिकेच्या टाकीत मृतदेह

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेने सिडकोकडून हस्तांतरित करून घेतलेल्या कोपरा सेक्टर १० मधील (कोपरा गावाजवळील) स्मशानभूमीच्या पाण्याच्या टाकीत कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. हा मृतदेह गेल्या पंधरा दिवसांपासून ते महिनाभरापासून टाकीत पडून असावा, असा संशय व्यक्त केला जात असून या काळात अंत्यविधीसाठी आलेल्या नागरिकांनी त्याच टाकीतील पाण्याचा पान २ वर






## शेतीच्या पेरण्या खोळंबल्या | पाणीटंचाईचे संकट गडद

# रायगडकर मान्सूनच्या प्रतीक्षेत

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

यंदा देशात मान्सूनचे आगमन वेळेवर झाले असले तरी रायगड जिल्ह्यात अद्यापही समाधानकारक पावसाची प्रतीक्षा कायम आहे. मान्सूनचा प्रवास मंदावल्याने जिल्ह्यातील शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाची चिंता वाढली असून पावसाअभावी भात पेरणीची कामे खोळंबली आहेत. वाढत्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले असून पाणीटंचाईचे संकटही अधिक गडद होत चालले आहे.



हवामान खात्याने मान्सून १० जूनपर्यंत मुंबई परिसरात दाखल होण्याचा अंदाज वर्तविला होता. मात्र १४ जून उजाडूनही रायगडसह कोकणातील अनेक भागांमध्ये मान्सूनचा पाऊस अद्याप पोहोचलेला नाही. केरळ आणि त्यानंतर सिंधुदुर्गात वेळेवर दाखल झालेला मान्सून पुढे सरकताना मंदावल्याने तो सध्या रत्नागिरी परिसरातच थांबलेला असल्याचे चित्र आहे. त्यामुळे रायगडकरांची प्रतीक्षा आणखी वाढली आहे.

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून अधूनमधून ढगाळ वातावरण निर्माण होत असले तरी त्यातून अपेक्षित पाऊस पडत नाही. काही वेळ ढग दाटून येतात, विजांचा कडकडाटही होतो; मात्र त्यानंतर कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे वातावरणातील उष्णता आणि आर्द्रता वाढून नागरिकांना पान २ वर




# शालार्थ आयडीच्या कार्यवाहीसाठी आता कालमर्यादा!

■ उपसंचालकांना १५ दिवसांत निर्णय घेणे बंधनकारक

■ त्रुटी असल्यास एकदाच कळवाव्या लागणार

| रायगड | प्रतिनिधी |

राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ प्रणालीतील नाव समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शालार्थ आयडी मंजुरीच्या प्रक्रियेसाठी प्रथमच टप्पानिहाय कालमर्यादा निश्चित करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांना निर्धारित मुदतीत निर्णय घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शालार्थ आयडी मंजुरीसाठी अर्ज दाखल झाल्यानंतर विविध स्तरांवर होणारा विलंब आणि त्यातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रस्ताव अनेक महिने प्रलंबित राहण्याच्या प्रकारांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राज्यातील अनुदानित शाळांतील शाळा, जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका शाळांतील कार्यरत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते शालार्थ प्रणालीद्वारे देण्यात येतात. शिक्षक, कर्मचाऱ्यांना शालार्थ क्रमांक देण्याबाबत २०१९ मध्ये कार्यपद्धती निश्चित केली आहे. तसेच वैयक्तिक मान्यता प्रदान करणे, शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबत २०२२ मध्ये कार्यपद्धती निश्चित करण्यात आली. मात्र, उच्च न्यायालयाने शालार्थ मान्यता, बदली, पदोन्नती आणि नाव समाविष्ट करण्यासंदर्भातील निर्देशांचे पालन होत नसल्याबाबत निरीक्षण नोंदवले आहे. विशेषतः शिक्षणाधिकारी आणि विभागीय शिक्षण उपसंचालक स्तरावर प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित राहत असल्याने शिक्षकांना वेतन आणि सेवा लाभ मिळण्यात विलंब होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले होते. तसेच शालार्थ मान्यता देण्याच्या प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांकडून कालमर्यादेत कार्यवाही होत नसल्याने अवमान याचिकांचे प्रमाण वाढत असल्याने उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबत कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

शिक्षण विभागाने केलेल्या नव्या तरतुदीनुसार, राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या प्रकरणांमध्ये शालार्थ आयडीसाठी आलेल्या प्रस्तावांची छाननी करून पुढील स्तरावर पाठवण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांना १५ दिवसांची मुदत असणार आहे. प्रस्तावात त्रुटी असल्यास त्या एकदाच कळवाव्या लागतील. व्यवस्थापनाने त्रुटींची पूर्तता करून सात दिवसांत प्रस्ताव पुन्हा सादर करणे आवश्यक असेल. त्यानंतर मंजुरी अथवा नामंजुरीचा प्रस्ताव विभागीय उपसंचालकांकडे १५ दिवसांत पाठवावा लागेल. विभागीय उपसंचालकांना प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी प्रत्येकी १५ दिवसांची मुदत निश्चित करण्यात आली आहे.

उच्च माध्यमिक शाळांबाबत अशाच प्रकारे विभागीय उपसंचालक आणि विभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांसाठी १५ दिवसांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया निश्चित वेळेत पूर्ण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. निर्धारित कालावधीत निर्णय घेणे शक्य नसल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी विलंबाची कारणे लेखी नोंदवून वरिष्ठांना कळवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## सांबरकुंडाचे पाणी पेटणार

शासनाला दिला आहे.भूसंपादनाचा मोबदला अद्याप ठरला नसतानाही शासनाने नेमलेल्या महालक्ष्मी इन्फ्रा प्रोजेक्टची यंत्रणा धरण क्षेत्रात पोहोचल्याने संतप्त बाधित शेतकऱ्यांची तातडीची बैठक महानवाडी येथील श्री राधाकृष्ण गणपती मंदिरात पार पडली. या बैठकीत न्याय मिळविण्यासाठी शासनाला पत्रव्यवहार करून पुढील रणनीती ठरविण्यात आली.यावेळी सांबरकुंड माध्यम प्रकल्पात बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनीआपली हजेरी लावली होती. या बैठकीत बाधित शेतकऱ्यांनी विविध विषयांवर चर्चा करून बाधितांचे प्रश्न तडीस लावण्याचा निर्धार करण्यात आला.

यासाठी प्रसंगी प्रशासकीय अधिकाऱ्यांसमोर बाजू मांडण्याबरोबर आंदोलन करण्यासाठी शेतकऱ्यांनी सज्ज राहायला हवे असा सूर उपस्थितांमध्ये ऐकावयास आला.सांबरकुंड माध्यम प्रकल्प हा शासनाच्या पटलावर आलेला प्रकल्प सध्या चर्चेत आहे. तब्बल पन्नास वर्षांहून अधिक काळापासून रखडलेल्या या प्रकल्पाने आता गती घेतली आहे. हे धारण होणार आणि अलिबाग तालुका पाणी टंचाईमुक्त होऊन दुबार पैकी होणार अशा चर्चांना उधाण आले आहे. या प्रकल्पाचे विशेष म्हणजे शेतकऱ्यांनी विकासाच्या मुद्द्यावर धरणाला सुरुवातीपासून सकारात्मकता दर्शवली.त्यामुळे ज्या भूसंपादन शाखेला भूसंपादन करण्याचे काम देण्यात आले त्यांनी शेतकऱ्यांना पुढे ओढवणाऱ्या संकटांबाबत अनभिज्ञ ठेवले. भूसंपादन नोटीस बजावल्या शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या. अशाच पद्धतीने अंतिम निवडा करून शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळवले आहे, असा आरोप संतप्त शेतकऱ्यांनी केला आहे.

भूसंपादन केल्यांनतरत्या बदल्यात दिला जाणारा मोबदला देण्यास शासनाकडून विलंब झाला. जेव्हा शासनाकडून धरणाच्या भूसंपादन मोबदल्याचा निधी जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाला तेव्हा नवीन भूसंपादन कायदा लागू करण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांनी नवीन भूसंपादन कायद्यानुसार जमिनीचा मोबदला द्यावा अशी मागणी केली. ती शासनाने मान्य केली. परंतु जुना मोबदला जाहीर झाला होता त्याच्या अनुषंगाने भूसंपादन मोबदला देण्याचे शासनाने मान्य केले. परंतु नवीन भूसंपादन कायद्यानुसार चालू बाजार भावाच्या चौपट मोबदला देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली. यामुळे शासनाची अडचण झाली आहे. कारण भूसंपादन प्रक्रिया शासनाच्या अधिकाऱ्यांमुळेच लांबणीवर गेल्याचे शेतकऱ्यांनी शासनाच्या निदर्शनात आणून दिले आहे. उभारला जाणारा प्रकल्प केवळ शेतीसाठी, पिण्याच्या पाण्यासाठी नाहीतर औद्योगिकरणासाठी वापरला जाणार आहे. यामुळे सिडकोच्या धर्तीवर दिला जाणारा मोबदला शासनाने सांबरकुंड प्रकल्पग्रस्तांना द्यायला हवा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## जेएनपीएच्या जेएसडब्ल्यू जेट्टीवर दोघांचा मृत्यू

प्रचंड दाब निर्माण होऊन भीषण स्फोट झाला. स्फोट इतका जबरदस्त होता की घटनास्थळी कार्यरत असलेले ओरिएंट कंपनीचे कर्मचारी जगन्नाथ गावंड आणि बेंजोप्लास्ट कंपनीचे लोडिंग मास्टर राजेंद्र शिंदे यांचा जागीच मृत्यू झाला.अपघात इतका भीषण होता की दोघांनाही बचावाची कोणतीही संधी मिळाली नाही. दुर्घटनेनंतर सहकारी कर्मचाऱ्यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले; मात्र दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

दरम्यान, या दुर्घटनेनंतर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. काम सुरू करण्यापूर्वी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या होत्या का? कामगारांना आवश्यक सुरक्षा उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली होती का? पाईपलाईनमधील दाबाची तपासणी झाली होती का? तसेच धोकादायक स्वरूपाच्या कामासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि देखरेख पुरेशी होती का? याबाबत चर्चा सुरू झाली आहे.मृतांच्या नातेवाईकांनी या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, संबंधित यंत्रणांनी आवश्यक खबरदारी घेतली असती तर ही दुर्घटना टाळता आली असती. त्यामुळे संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## रहिवासी भूभागावर औद्योगिक शिक्का

घेता केवळ अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. अशा संवेदनशील विषयावर प्रत्यक्ष जनसुनावणी घेऊन नागरिकांची मते जाणून घेणे आवश्यक असल्याची मागणी करण्यात येत आहे.दरम्यान, जेएनपीएला स्थापन होऊन ३७ वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी बंदर परिसरातील जसखार, सोनारी, करळ, सावरखार आणि इतर गावांमध्ये आजही अनेक मूलभूत नागरी सुविधांचा अभाव असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. सुरक्षित रस्ते, सार्वजनिक सुविधा, खेळाची मैदाने आणि मोकळ्या जागांचा अभाव असल्याने गावांवरील ताण वाढत चालला आहे. विकासाच्या नावाखाली जमीन गेली, मात्र सुविधांचा विकास झाला नसल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.यामुळे आधीच मर्यादित जागेत राहणाऱ्या ग्रामस्थांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून उर्वरित मोकळ्या भूभागावरही औद्योगिक वापराचा प्रस्ताव आल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रस्तावित भू-वापर बदलामुळे गावांच्या भोवती औद्योगिक पट्टा निर्माण होऊन स्थानिकांच्या आरोग्य व पर्यावरणावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, या प्रस्तावाला रांजणपाडा ग्रामस्थांनी सर्वप्रथम जोरदार विरोध दर्शविला असून हरकती नोंदविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ग्रामस्थांनी हा केवळ एका गावाचा प्रश्न नसून संपूर्ण परिसराच्या अस्तित्वाशी निगडित विषय असल्याचे स्पष्ट केले आहे. आज रांजणपाडा उभा ठाकला असला तरी उद्या या निर्णयाचे परिणाम फुंडे, जासई, जसखार, सावरखार, सोनारी, करळ तसेच इतर गावांनाही भोगावे लागू शकतात, अशी भावना व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, रांजणपाडा ग्रामस्थांनी घेतलेली भूमिका इतर बाधित गावांसाठी दिशादर्शक ठरणारी आहे. त्यामुळे सर्व गावांनी एकत्र येऊन या प्रस्तावाचा अभ्यास करावा, हरकती नोंदवाव्यात आणि आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा, असे आवाहन करण्यात येत आहे. प्रस्तावित भू-वापर बदलाबाबत स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि विविध सामाजिक संघटना हरकती दाखल करण्याच्या तयारीत असून या विषयावर व्यापक चर्चा सुरू झाली आहे. येत्या काही दिवसांत या प्रश्नावर ग्रामस्थांची भूमिका अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. 'आज रांजणपाडा लढतोय; उद्या संपूर्ण परिसराला लढावे लागू शकते. त्यामुळे प्रत्येक गावाने जागे होऊन आपली हरकत नोंदविण्याची हीच योग्य वेळ आहे,' अशी भावना स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

२० जून ही हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत असून नागरिकांनी प्रस्तावाचा सखोल अभ्यास करून आपली मते लेखी स्वरूपात जेएनपीए प्रशासनाकडे नोंदवावीत, असे आवाहन करण्यात येत आहे.

## महापालिकेच्या टाकीत मृतदेह

वापर केल्याने महापालिका प्रशासनाविरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.कोपरा गावातील स्मशानभूमीचा वापर प्रामुख्याने स्थानिक ग्रामस्थांकडून केला जातो. गुरुवारी (ता. ११) गावातील संतोष तांबोळी

पान १ वरून

यांच्या २७ वर्षीय पुतण्याचा मेंदूतील रक्तस्रावाने मृत्यू झाला होता. या २७ वर्षी तरूणाचा अंत्यविधीसाठी करण्यासाठी तांबोळी यांच्यासह अनेक नातेवाईक स्मशानभूमीत गेले असता परिसरात उग्र दुर्गंधी येत होती. मात्र त्याकडे विशेष लक्ष देण्यात आले नाही. दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (ता.१२) होम व पुढील विधीसाठी पुन्हा स्मशानभूमीत तांबोळी यांचे नातेवाईक गेल्यावर त्यांना पाण्यातून दुर्गंधी अधिक तीव्र येऊ लागल्याने ग्रामस्थांनी परिसराची पाहणी केली. त्यांना काही सापडले नाही.

महापालिकेच्या कर्मचाऱ्याला तेथे बोलावल्यानंतर त्या कर्मचाऱ्यांनी पाण्याच्या टाकीत डोकावून पाहिल्यानंतर त्यांना कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह दिसून आला.संबंधित स्मशानभूमीत सीसीटीव्ही कॅमेरे किंवा सुरक्षा रक्षक नसल्याने मृत व्यक्तीची ओळख पटविण्यात अडचणी येत आहेत. तीन दिवस उलटूनही मृतदेह कोणाचा आहे, याचा उलगडा झालेला नाही. खारघर पोलीस याबाबत तपास करत आहेत. या दरम्यान शिवसेना (ठाकरे) गटाच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणी महापालिका प्रशासनावर टीका करत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. तसेच महापालिका क्षेत्रातील सर्व स्मशानभूमींमध्ये सुरक्षा रक्षकांची नियुक्ती आणि सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## आपटा स्मशानभूमीत अघोरी विद्येचा थरार!

केले जातात, त्या ठिकाणच्या चारही खांबांना काळा दोरा बांधण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर, तिथे नारळ, लिंबू आणि एका वांग्याला अनेक दोरे गुंडाळून ठेवत काहीतरी अघोरी कृत्य आणि जादूटोणा केल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.स्मशानभूमीसारख्या ठिकाणी जिथे अंत्यसंस्कार केले जातात, तिथेच असा भयानक प्रकार घडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीची लाट पसरली आहे. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन कोणत्यातरी भोंदूबाबाने किंवा अज्ञात व्यक्तीने स्वार्थासाठी हा जादूटोण्याचा प्रकार केला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे.

२१ व्या शतकात आणि विज्ञानाच्या युगातही असे अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे प्रकार घडतअसल्याने संतापही व्यक्त होत आहे.सदर अघोरी प्रकार नेमका कोणी आणि कोणत्या उद्देशाने केला, याचा शोध घेणे अत्यंत गरजेचे आहे. या घटनेची पोलिसांनी आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) तातडीने गंभीर दखल घ्यावी. स्मशानभूमीत जाऊन असे कृत्य करणाऱ्या अज्ञाताचा शोध घेऊन त्याच्यावर जादूटोणा विरोधी कायद्याअंतर्गत कडक कारवाई करावी, अशी आग्रही मागणी आपटा गावातील नागरिकांकडून केली जात आहे.

## रायगडकर मान्सूनच्या प्रतीक्षेत

प्रचंड उकाडा सहन करावा लागत आहे.

रायगड हा भात उत्पादक जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी मान्सूनवर अवलंबून आहेत. जूनच्या पहिल्या आठवड्यात पावसाची सुरुवात झाल्यानंतर भात पेरणीच्या कामांना वेग येतो. मात्र यंदा पाऊस लांबल्याने शेतकरी पेरणीसाठी आवश्यक तयारी करूनही प्रत्यक्ष कामे सुरू करू शकलेले नाहीत. पाऊस आणखी उशिरा झाल्यास पेरणीचे वेळापत्रक बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.दरम्यान, काही दिवसांपूर्वी जिल्ह्याच्या दक्षिण भागातील पोलादपूर, महाड, माणगाव, रोहा, तळा, म्हसळा आणि श्रीवर्धन तालुक्यांमध्ये मान्सूनपूर्व सरींनी हजेरी लावली होती. या सरींमुळे शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले होते. मान्सून आता काही दिवसांत दाखल होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र त्यानंतर पावसाने पुन्हा दडी मारल्याने शेतकरी निराश झाले आहेत.

## एसटी बसच्या चाकाला चिरा

नियमित तपासणी करावी, अशी मागणी केली आहे. प्रवाशांच्या जीवाशी खेळ होऊ नये यासाठी जीर्ण व धोकादायक चाके तातडीने बदलण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.दरम्यान, अलिबाग डेपोच्या बसची तातडीने तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, तसेच अशा अवस्थेतील वाहनांना प्रवासी सेवेत पाठविण्यापूर्वी त्यांची काटेकोर तपासणी करावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून करण्यात येत आहे. या घटनेमुळेएसटी महामंडळाच्या वाहन देखभाल व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## पिरवाडी किनाऱ्यावर जीव धोक्यात

तत्परता दाखवत बचावकार्य राबवून त्या दोघांना सुरक्षित किनाऱ्यावर आणले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र अशा प्रकारच्या घटना या परिसरात सातत्याने घडत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.बाजारपूर ते पिरवाडी दरम्यान सुमारे सात ते आठ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा असून पिरवाडीसमोरील टापू पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनला आहे. ओहोटीच्या वेळी सहज जाता येणारा हा टापू भरती सुरू होताच काही मिनिटांत समुद्राच्या पाण्याने वेढला जातो. परिणामी अनेक पर्यटक अडकून पडतात आणि मदतीसाठी आर्त हाका मारतात. धक्कादायक बाब म्हणजे, या ठिकाणी बचावकार्य करणाऱ्या जीवरक्षकांकडे आवश्यक सुरक्षा साधनसामग्रीच उपलब्ध नाही. लाइफ जॅकेट, लाइफ बॉय, दोरखंड, बचाव नौका यांसारखी मूलभूत साधने नसतानाही जीवरक्षक आणि स्थानिक युवक समुद्रात उतरून पर्यटकांचे प्राण वाचवत आहेत. त्यामुळे पर्यटकांसोबतच बचावकार्य करणाऱ्यांचाही जीव धोक्यात येत आहे.विशेष म्हणजे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत नागाव, काशीद आणि हरिहरेश्वर या समुद्रकिनाऱ्यांवर अत्याधुनिक रोबोटिक वॉटर क्राफ्ट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मात्र वारंवार बचावकार्याची गरज भासणाऱ्या पिरवाडी किनाऱ्यावर अशी कोणतीही सुविधा उपलब्ध करण्यात आलेली नाही.याबाबत उरण तालुका मराठी पत्रकार संघाने जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे पिरवाडी किनाऱ्यासाठी रोबोटिक वॉटर क्राफ्ट, अत्याधुनिक बचाव साहित्य आणि आवश्यक सुरक्षा उपकरणे उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच धोकादायक क्षेत्र असल्याचे इशारा फलक, भरती-ओहोटीची माहिती देणारी यंत्रणा आणि प्रशिक्षित बचाव पथक तैनात करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.पिरवाडी किनाऱ्यावर स्थानिक नागरिक आणि जीवरक्षक स्वतःचा जीव धोक्यात घालून पर्यटकांचे प्राण वाचवत आहेत. मात्र प्रशासनाकडून आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून दिली जात नाही. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?, असा सवाल उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम दामोदर कडू यांनी उपस्थित केला आहे.

## एसटीच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी

गावाकडे जाणारी मोटारसायकल समोरून येत होती. चरई-सोनारवाडी येथील वळणावर दोन्ही वाहने समोरासमोर आल्याने जोरदार धडकली. या अपघातात मोटारसायकलस्वार नारायण खेडेकर हे गंभीर जखमी झाले. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने उपचारासाठी महाड येथील रुग्णालयात हलविण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे पोलीस हेका. तुषार सुतार व सतीश कदम, काळभैरवनाथ रेस्क्यू टीमचे दीपक उतेकर, भाजप तालुकाध्यक्ष वैभव चांदे तसेच युवा सेनेचे दत्ता मोरे यांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. या प्रकरणाचा तपास पोलादपूर पोलीस करीत आहेत.

## चौक कर्जत मार्गावर अपघात

सुमारास हा अपघात घडल्याने त्यांना तात्काळ मदत मिळाली नाही. घटनास्थळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार व चौक प्रभारी विशाल पवार यांनी धाव घेतली घेऊन चौक ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चौक प्रभारी विशाल पवार हे करीत आहेत. हा रस्ता रूंदीकरण झाले आहे, मात्र त्यावर दुभाजक नसल्याने दुचाकी स्वार यांना तात्काळ अंदाज येत नाही, मुळात हा रस्ता दोन पदरी की चार पदरी आहे, हेच समजून येत नाही, रस्ता मोठ्या प्रमाणात रुंद आहे. या रस्त्याला दुभाजक का नाहीत? असा प्रश्न निर्माण झाला आहे. मागील काही महिन्यात असे दुर्दैवी अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. दोन्ही तरुण घरातील एकुलते एक होते असे समजते. त्यामुळे दोन्ही कुटुंबावर मोठा आघात झाला असल्याचे उपस्थित असलेल्या मित्र परिवार यांनी सांगितले.

## शाळांमध्ये आजपासून किलबिलाट

वहाळ राजिप शाळेत प्रवेशोत्सवासाठी उपस्थित राहणार आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना शालेय प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून सोमवारी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी 'शाळा प्रवेशोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची पदयात्रा, पालकांच्या गृहभेटींचे नियोजन करण्यात आले आहे. शाळेचा परिसर ग्रामस्थांच्या सहाय्याने स्वच्छ करून शाळा सडा रांगोळी व पानाफुलांनी सुशोभित करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यात रायगड जिल्हा परिषदेच्या एकूण ३ हजार ५८ शाळा आहेत. जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांचे रूप पूर्णपणे बदलून गेले आहे. डिजिटल क्लासरूम्स, कृतीयुक्त अध्ययन, विविध खेळ, सहशालेय व अभ्यासपूरक उपक्रम याच बरोबर मूल्य शिक्षणावर विशेष भर, प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष, १०० टक्के प्रशिक्षित उच्चशिक्षित शिक्षक, तसेच शाळेत विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश, मोफत गणवेश, मोफत मध्यान्ह भोजन, उपस्थिती भत्ता, शिष्यवृत्ती, संगणक शिक्षण या सुविधांचा लाभ दिला जातो. मुलांना प्रोत्साहन व मार्गदर्शन करण्यासाठी लोकप्रतिनीधी, सनदी अधिकारी तसेच शिक्षण विभागातील अधिकारी शाळेस भेट देणार आहेत.

बालकांची प्रभातफेरी काढण्यात येणार असून विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्यात येणार आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त पालकांनी आपल्या पाल्यांना रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेशित करावे तसेच सोमवारी साजऱ्या होणाऱ्या प्रवेशोत्सवात आपआपल्या परिसरातील शाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकार डॉ. रूपाली सातपुते, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारूद्र नाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहितुले यांनी केले आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या वाढावी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी सोमवारी (ता.१५) राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पनवेल तालुक्यातील वहाळ राजिप शाळेत प्रवेशोत्सवासाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासह प्रधान सचिव शालेय शिक्षण रणजीत सिंह देओल, आयुक्त शालेय शिक्षण सचिंद्र प्रताप सिंह, विभागीय आयुक्त कोकण रुबल अग्रवाल, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारूद्र नाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहितुले यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक, कुसुम शंकर गायकर, ज्ञानेश्वर शंकर गायकर, पार्वती शंकर गायकर, अनुराधा गंगाराम भायदे, अस्मिता अनिल वांगीलकर, सायली शरद वांगीलकर, रा. तुरमाळे ता.पनवेल, जि. रायगड असून त्यांच्याकडून सदरच्या मिळकती कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरवलेला असून सदरच्या मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे तुरमाळे, ता.पनवेल, जि. रायगड**

| अ.क्र. | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १ | २७/१ | ०-०४-०० | ०.११ |
| २ | १२९/४ | ०-०८-०० | १.५० |
| ३ | २७/२/ब | ०-२३-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-२४-०० | १.७२ |
| ४ | ३८/२ | ०-०८-०० | १.५६ |
| ५ | ३९/३ | ०-०३-५० | ०.४२ |

सदर वर केलेल्या मिळकती या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावीत. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख १५/०६/२०२६ सही/-
ॲड. शैलेश प्रभाकर पाटील
पत्ता - शॉप नं. १०, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर, ता. अलिबाग जि. रायगड

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक दिलीप फकीर खुटले, मारुती फकीर खुटले,मैनाबाई शांताराम पाटील, बारकीबाई भाऊ पारधी, गंगुबाई बाळाराम पालकर, दिनेश दशरथ खुटले, ललिता ज्ञानेश्वर धरणेकर, योगिता संतोष म्हस्कर, विलास धोंडू म्हस्कर, साहिल संतोष म्हस्कर, स्नेहल संतोष म्हस्कर, अपाक आई योगिता म्हस्कर, निरा नामदेव म्हात्रे, सुलोचना बाळाराम म्हात्रे रा. नांदगाव, ता. पनवेल, जि. रायगड असून त्यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरवलेला असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| नांदगाव ता. पनवेल जि. रायगड | ५०/४/ड | ०-५१-०० पो.ख. ०-३-३० एकूण ०-५४-३० | ५.९४ |

सदर वर केलेल्या मिळकतीमधील अलिबाग-विरार बहुउद्देशिय मार्गिकेकरिता संपादित होणारे क्षेत्र वगळून उर्वरित मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावीत. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख १५/०६/२०२६ सही/-
ॲड. शैलेश प्रभाकर पाटील
पत्ता - शॉप नं. १०, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर, ता. अलिबाग जि.रायगड

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक महादेव बामा गायकर, ताराबाई लहू भोईर, अनिता अनिल खुटले, आनंदीबाई हिरामण ठोंबरे, सुमन गणेश म्हसकर, गोपाळ परशुराम हुद्दार, कुसुम शंकर गायकर, ज्ञानेश्वर शंकर गायकर, पार्वती शंकर गायकर, अनुराधा गंगाराम मायदे, अस्मिता अनिल वांगिलकर, सायली शरद वांगिलकर, संजिवनी संतोष उदरे, वसंत बामा उदरे,विष्णू बामा उदरे, शुभम संतोष उदरे, संजिवनी संतोष उदरे, सौरभ संतोष उदरे, महानंदा विष्णू पाटील, सुनिता नामदेव वाजेकर, अनिता दर्शन कडू, मनिषा नीरज पाटील, आशा पांडुरंग पावनेकर, दत्तात्रेय पांडुरंग पावनेकर, प्रगती पांडुरंग पावनेकर, अमर पांडुरंग पावनेकर रा. वडवली, ता.पनवेल, जि. रायगड असून त्यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरवलेला असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| वडवली ता. पनवेल जि. रायगड | ८/८ | ०-२५-८० पो.ख. ०-०४-५० एकूण ०-३०-३० | २.३१ |

सदर वर केलेली मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावीत याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग सही/-
तारीख १५/०६/२०२६ ॲड. शैलेश प्रभाकर पाटील
पत्ता - शॉप नं. १०, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर, ता. अलिबाग जि. रायगड

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक महादेव बामा गायकर, वसंत बामा उदरे, विष्णू बामा उदरे, शुभम संतोष उदरे, संजिवनी संतोष उदरे, सौरभ संतोष उदरे, महानंदा विष्णू पाटील, सुनिता नामदेव वाजेकर, अनिता अनिल खुटले, आनंदीबाई हिरामण ठोंबरे, सुमन गणेश म्हसकर, गोपाळ परशुराम हुद्दार, कुसुम शंकर गायकर, ज्ञानेश्वर शंकर गायकर, पार्वती शंकर गायकर, अनुराधा गंगाराम मायदे, अस्मिता अनिल वांगीलकर, सायली शरद वांगीलकर, अनिता दर्शन कडू, मनिषा नीरज पाटील, अमर पांडुरंग पावणेकर, आशा पांडूरंग पावणेकर, दत्तात्रेय पांडुरंग पावणेकर, प्रगती पांडुरंग पावणेकर, ताराबाई लहू भोईर रा. तुरमाळे, ता.पनवेल, जि.रायगड असून त्यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरवलेला असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| तुरमाळे ता. पनवेल जि. रायगड | १७/१ | ०-९०-०० पो.ख. ०-०६-०० एकूण ०-९६-०० | १३.६२ |

सदर वर केलेली मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावीत याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग सही/-
तारीख १५/०६/२०२६ ॲड. शैलेश प्रभाकर पाटील
पत्ता - शॉप नं. १०, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर, ता. अलिबाग जि. रायगड

# कॅशलेस व्यवहाराचा नारा कागदावरच




। कर्जत । प्रतिनिधी ।

सरकार 'डिजिटल इंडिया' आणि 'कॅशलेस व्यवहार'चा नारा देत प्रत्येक शासकीय व्यवहार ऑनलाईन करण्यावर भर देत आहे. असे असताना मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ अर्थात एमएसआरडीसीच्या अनेक प्रादेशिक कार्यालयात अद्यापही डिजिटल पेमेंट सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे दंड, परवानगी शुल्क, टोलपास, रिफंड यासारखे व्यवहार करायला येणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१६ पासून 'डिजिटल इंडिया' मोहिमेअंतर्गत प्रत्येक व्यवहार कॅशलेस, पारदर्शक आणि झटपट व्हावा यासाठी यूपीआय आणि रूपे यांसारख्या सुविधा देशभर सुरू केल्या. शाळेची फी असो की सरकारी रुग्णालयातील बिल युपीआय स्कॅन करून भरण्याचा आग्रह सरकारी यंत्रणेने धरला. मात्र, महाराष्ट्रात रस्ते आणि पायाभूत सुविधांसाठी जबाबदार असलेल्या एमएसआरडीसीच्या अनेक कार्यालयात मात्र चित्र वेगळे आहे. या कार्यालयात अद्यापही युपीआय, डेबीट-क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंग यापैकी काहीही चालत नाही. कार्यालयात गेल्यावर ''फक्त रोख स्वीकारली जाईल, त्यानंतरच कागदपत्रे दिले जाईल'' असे सांगण्यात येते.

एमएसआरडीसी कार्यालयात वेगवेगळ्या तालुक्यातून नागरिक विविध कामांसाठी येत असतात. त्यात नव्या रस्त्याची परवानगी, नुकसान भरपाईचा अर्ज, टोलसंबंधी तक्रार अथवा दंडाची रक्कम भरणे इत्यादी कामे असतात. मात्र, या कार्यालयात युपीआय, डेबिट-क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग अशी कोणतीही डिजिटल पेमेंट सुविधा उपलब्ध नसल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

### गैरसोयीचे मुद्दे

1. **वेळेचा अपव्यय:** डिजिटल पेमेंट नसल्याने नागरिकांना एटीएम शोधावे लागते. त्या गडबडीत अनेकदा कार्यालयात गर्दी वाढते आणि एका कामासाठी अर्धा दिवस वाया जातो.
2. **पारदर्शकतेचा प्रश्न:** रोख व्यवहारात पावती मिळाली नाही तर रक्कम कुठे गेली याचा हिशेब लागत नाही. डिजिटल पेमेंटमुळे व्यवहाराचा रेकॉर्ड लगेच तयार होतो.
3. **सुरक्षा धोका:** मोठी रक्कम रोखीने घेऊन येणे सद्यस्थितीत धोकादायक ठरते.
4. **सरकारच्या धोरणाशी विसंगती:** केंद्र आणि राज्य सरकार शासकीय कार्यालये १० टक्के कॅशलेस करण्याचा आग्रह धरत आहेत. अशात एमएसआरडीसीसारखी मोठी संस्था मागे राहणे ही विरोधाभासी बाब आहे.

> **बेलापूर येथील एमएसआरडीसीच्या कार्यालयात काही कामानिमित्त गेलो असता, त्यावेळी चलन फाडण्यासाठी ऑनलाइन व्यवहार करणार तितक्यात ऑनलाइन सुविधा नसल्याने रोख रक्कम द्यावी लागेल, असे सांगण्यात आले. याबाबत संबंधितांकडे विचारणा केली असता, बारकोड सुविधा नसल्याने रोख रक्कम स्वीकारणारली जाईल, असे सांगण्यात आले. याबाबत तक्रार अर्ज एमएसआरडीसी बेलापूरचे सह संचालक उदय चंदर डी यांच्याकडे दिला आहे. तसेच, या कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्यांसाठी बसण्याची व्यवस्था आहे; परंतु, पंखा नसल्याने गरमीत बसून वाट बघावी लागते. सध्या उन्हाचा पारा उच्चांक असल्याने ते आरोग्यासाठी त्रासदायक ठरत आहे आणि अशा कार्यालयात पंखा किवा वातानुकूलित यंत्र नाही त्या ठिकाणी बसविण्यात यावी.**
> **- अमोघ कुलकर्णी**

> **डिजिटल बँकिंग सेवा सुरू करण्यासाठी लवकरच युपीआय बारकोडसाठी बँक शाखेशी संपर्क साधून ऑनलाइन व्यवहाराची सोय उपलब्ध करून नागरिकांची होणारी गैरसोय दूर करू.**
> **- उदय चंदर डी, सह संचालक, एमएसआरडीसी बेलापूर**

# माथेरानच्या नगराध्यक्षांना घरचा आहेर?

## स्टॉलधारकांचे पुन्हा अतिक्रमण; मुख्याधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरातील दस्तुरी येथील इ-रिक्षा स्टँड रस्त्यावर अतिक्रमण करून लावलेले स्टॉल्स शहराचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी उचलून टाकले होते. मात्र, त्या ठिकाणी पुन्हा स्टॉल्स लागले असून, व्यवसाय करणारे प्रशासनाला जुमानत नसल्याचे चित्र दस्तुरी नाका येथे पहायला मिळत आहे. त्यामुळे त्यांना आता घरचाच आहेर मिळाला असल्याचे बोलले जात आहे.

पर्यटक दस्तुरी नाका येथे आपले वाहन पार्किंग करून माथेरान शहरात प्रवेश करीत असतात. शहरात प्रवेश करीत असताना काही मिनिटांवर पर्यावरणपुरक इ-रिक्षांचा स्टँड आहे. या स्टँडच्या आवारात खूप मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करून दुकाने टाकण्यात आली आहेत. त्यामुळे शहराचे प्रवेशद्वार व्यवसाय करणाऱ्यांनी व्यापले असल्याने माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी त्या सर्व दुकानांवर स्वच्छतेच्या नावाखाली ॲक्शन घेत त्यांच्यांकडून हे सर्व स्टॉल येथून हटवण्यात आले होते. मात्र, हे स्टॉल हटवून तीन ते चार दिवस झाले नाही तर पुन्हा एकदा या ठिकाणी हटविण्यात आलेले स्टॉल पुन्हा उभारण्यात आले आहेत. त्यामुळे आता माथेरान नगरपरिषद यावर लक्ष देणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याचवेळी नगरपरिषदेचे अधिकारी याच रस्त्याने शहरात जात असतात, त्यांना ते अनधिकृत स्टॉल दिसत नाहीत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, मुख्याधिकारी कोणाच्या दबावाखाली राहून पुढाकार घेत नाहीत? असा सवाल सर्वसामान्य विचारत आहेत.



● काही दिवसांपुर्वी दस्तुरी नाका येथील हटविण्यात आलेले अनधिकृत स्टॉल्स पुन्हा त्याच ठिकाणी उभारण्यात आले आहेत.

## निवडक

### पावसाच्या विलंबामुळे ग्रामस्थ हवालदिल

**रेवदंडा :** मान्सूनच्या आगमनास विलंब होत असल्याने रेवदंडा पंचक्रोशीतील शेतकरी, बागायतदार आणि सर्वसामान्य ग्रामस्थ चिंतेत सापडले आहेत. जून महिन्याचा मध्य उलटत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने परिसरात पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र झाली आहे. विहिरी, बोअरवेल आणि पाणवठ्यांची पातळी घटल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. रेवदंडा पंचक्रोशीसह मुरूड तालुक्यातील साळाव, कोर्लई, बोर्ली, मांडळा, शिरगाव, मिठेखार, वळके, चोरढा तसेच अलिबाग तालुक्यातील थेरोंडा, चौल, नागाव, वावे, खानाव, रामराज, वळवळी, चिचोंटी, सुडकोळी आदी भागांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. अनेक विहिरी आणि जलस्रोत कोरडे पडण्याच्या मार्गावर असून ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत आहे. तसेच, शेतकरी देखील शेतीची पूर्वतयारी पूर्ण करून पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. भात लागवडीसाठी शेतांची मशागत, बांधबंदिस्ती आणि अन्य कामे पूर्ण झाली असली तरी पावसाअभावी पेरणी व लागवडीची कामे रखडली आहेत. वेळेत पाऊस न झाल्यास भात उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### पुंडलेंचा कथासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर

**रसायनी :** रसायनीतील साहित्यप्रेमी सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ पनवेलचे केंद्रीय प्रसिद्धी प्रमुख विलास नरहर पुंडले यांच्या ग्रामीण जीवनावर आधारित ''दान निसर्गाचे'' या कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा शनिवारी (दि.२०) सकाळी १०.०० वाजता नवी पनवेल सेक्टर २ येथील कर्नाटक संघ हॉल येथे संपन्न होणार आहे. सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ पनवेल आणि सर्जनशील पब्लिकेशन नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात कथासंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार असून, त्यानिमित्त राज्यस्तरीय कवीसंमेलनाचेही आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण संस्कृती, निसर्ग, माणुसकी, लोकजीवन आणि आदिवासी समाजाचे वास्तव दर्शन घडविणाऱ्या कथा या संग्रहात समाविष्ट आहेत. ''दान निसर्गाचे'', ''नामा गोमा ठाकर'', ''बैलपोळा'', ''श्राद्ध'', ''गिरीजा'' इत्यादी कथांमधून लेखकांनी ग्रामीण जीवनाचे जिवंत चित्रण केले आहे.

### पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके

**खरोशी :** सर्व शिक्षा अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद, नगरपालिका, सर्वअनुदानित, अंशत अनुदानित माध्यमिक व खासगी प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी मोफत पाठ्यपुस्तके शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मिळणार असल्याची माहिती पेण पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांनी दिली आहे. पेण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या खासगी शिक्षण संस्था आणि नगरपरिषदेच्या एकूण २६२ शाळांमधील १५ हजार २१५ विद्यार्थ्यांना सोमवारी (दि.१५) प्रवेश स्वागत सोहळ्यासह पुस्तकाचे वाटप होणार आहेत. तसेच, नवोदितांसाठी आकर्षक आरास आणि सेल्फी पॉइंटची नजाकतीची सजावट करण्यासाठी शालेय व्यवस्थापन आणि शिक्षक परिश्रम घेत आहेत. नव्या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ आनंदी व्हावा यासाठी मान्यवरांच्या हस्ते पाठ्यपुस्तके गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांना शालेय वातावरण प्रसन्न वाटावे, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. शालेय परिसर वर्गखोल्यांची विशेष आरास करण्यासाठी गेले आठवडाभर नियोजन आहे. गेल्यावर्षीही शाळेच्या पहिल्याच दिवशी पेणमधील शाळांमध्ये शालेय पुस्तकांचे वितरण करण्यात आल्याने विद्यार्थी आनंदी होते.

### ५२ वर्षीय व्यक्तीला लाखोंचा गंडा

**पनवेल :** विम्याचे अडकलेले पैसे आणि त्यावर मोठा परतावा मिळवून देण्याच्या बहाण्याने एका सायबर टोळीने एका ५२ वर्षीय व्यक्तीला तब्बल ६ लाख १० हजार रुपयांना गंडा घातला आहे. कामोठे पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कामोठे येथील राजीव चव्हाण यांनी २०१६मध्ये घेतलेल्या क्रेडिट कार्डसोबत त्यांना एक इन्शुरन्स पॉलिसी मिळाली होती. चव्हाण यांनी त्या पॉलिसीचा फक्त पहिलाच हप्ता भरला आणि ती माहिती मिळवून एका सायबर टोळीने वर्षभरापूर्वी आशिष गिडवानी नावाने चव्हाण यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी जुन्या पॉलिसीचे पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवून, श्रीराम लाइफ इन्शुरन्सच्या दोन नवीन पॉलिसी काढण्यास भाग पाडले. या पॉलिसीचे दोन हप्ते भरून घेतल्यानंतर त्या चोरट्याने आपला फोन बंद केला. त्यानंतर जुलै २०२५ मध्ये विकास गर्ग नावाच्या दुसऱ्या सायबर चोरट्याने फोन करून श्रीराम लाइफ इन्शुरन्स पॉलिसीचे पैसे काढून देण्याचे आमिष दाखवले. या भामट्यांनी चव्हाण यांना एकूण १३ लाख ७८ हजार ५५५ रुपये मिळणार असल्याचे सांगितले. ही रक्कम बँक खात्यात जमा करण्याच्या बहाण्याने चव्हाण यांच्याकडून तब्बल ६ लाख १० हजार रुपये चोरट्यांनी उकळले आणि आपले फोन बंद केले.

# वरुणराजाच्या प्रतीक्षेत बळीराजा

। पनवेल । प्रतिनिधी ।

जून महिना अर्ध्यावर आला असतानाही पनवेल परिसरात वरुणराजाने अद्याप जोरदार हजेरी लावलेली नाही. आकाशात दररोज काळे ढग जमा होत असून पावसाची चिन्हे दिसत आहेत; मात्र, अपेक्षित असा धो-धो पाऊस अद्याप कोसळलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पावसाबाबत उत्सुकता आणि चिंता दोन्हीही वाढल्या आहेत. पनवेल तालुक्यातील बळीराजा मात्र पावसाची वाट पाहत न बसता शेतीच्या कामांमध्ये व्यस्त झाला आहे. अनेक शेतकऱ्यांनी भाताच्या पेरणीसाठी आवश्यक असलेले बी-बियाणे शेतात टाकण्यास सुरुवात केली आहे. तसेच दहाड (भात रोपवाटिका) तयार करण्याची कामेही मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. पावसाच्या आगमनापूर्वी शेतांची मशागत, बांधबंदिस्ती आणि अन्य पूर्वतयारीची कामे अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत. कृषी साहित्य, बियाणे व खतांच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्येही शेतकऱ्यांची गर्दी वाढल्याचे चित्र आहे.



● (छायाचित्रः राजेश डांगळे)

# पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र वणवण



। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

मुंबईतील मंत्रालयात बसून अधिकारीपाणीजपूनवापरण्याचेआणि सिंचनाचे पाणी बंद करण्याचे मोठंमोठे आदेश सोडत आहेत. जलसंपदा विभागाने नुकतेच ३१ ऑगस्टपर्यंत केवळ पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याचे फर्मान काढले आहे. मात्र, श्रीवर्धन तालुक्यातील वास्तव या कागदी घोड्यांपेक्षा पूर्णपणे वेगळे आणि संतापजनक आहे. श्रीवर्धनमध्ये शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपसा केलाच जात नाही, येथील मुख्य गरज केवळ पिण्याच्या पाण्याची आहे. असे असतानाही, उन्हाळ्याच्या उत्तरार्धात स्थानिक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र वणवण करावी लागत असल्याने प्रशासकीय नियोजनाचे पार धिंडवडे निघाले आहेत.

जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव डवले यांनी दि.१३ जून रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि स्थानिक प्रशासनाला पाणी पुरवठ्याबाबत कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. परंतु, श्रीवर्धनमधील सद्यस्थिती पाहता हा आराखडा केवळ कागदावरच मर्यादित राहिल्याचे चित्र आहे. शासनाच्या आदेशात प्रामुख्याने सिंचनाची आवर्तने बंद करणे आणि अनधिकृत शेती उपसा रोखण्यावर भर देण्यात आला आहे. परंतु, श्रीवर्धन तालुक भौगोलिक आणि स्थानिक परिस्थिती पाहता, येथे धरणांमधून शेतीसाठी पाणी उपसा केलाच जात नाही. श्रीवर्धन शहरला पाणी पुरवठा करणारे रानवली धरण हे एकमेव जलसाठे असून जलसाठे हे प्रामुख्याने स्थानिक नागरिकांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवण्यासाठीच वापरले जातात. असे असूनही, सध्या अनेक गावांमध्ये आणि शहरातल्या प्रभागांमध्ये पिण्याचे पाणी वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात येतच नसल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. ''जर शेतीला पाणी जात नाही, तर मग हक्काचे पिण्याचे पाणी जाते कुठे?'' असा संतप्त सवाल स्थानिक महिलांकडून विचारला जात आहे.

# ऑनलाईन गेमिंगचा नाद पडला भारी

## रिक्षा चालकाने गमावले १.२६ कोटी रुपये

। पनवेल । प्रतिनिधी ।

ऑनलाइनगेमिंगमधूनघरबसल्या करोडपती होण्याच्या नादात एका रिक्षा चालकाने १ कोटी २६ लाख रुपये गमावल्याची खळबळजनक घटना उलवेमध्ये उघडकीस आली आहे. या २५ वर्षीय रिक्षाचालकाला सायबर टोळीने ऑनलाइन गेमिंगमध्ये अडकवून त्याच्याकडून ही रक्कम उकळल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी नवी मुंबई सायबर पोलिसांनी सायबर टोळीसोबतच गेमिंग ॲपचालकांविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा रिक्षा चालक तरुण उलवे येथे राहण्यास आहे. २०२४ मध्ये इन्स्टाग्रामवर व्हिडीओ पाहत असताना, त्याला या ऑनलाईन गेमींग ॲपची जाहिरात दिसली. गेम खेळून मोठ्या प्रमाणात पैसे जिंकण्याचे आणि ते त्वरित बँक खात्यात जमा करण्याचे आमिष या जाहिरातीत देण्यात आले होते. या आमिषाला बळी पडून त्याने या लिंकवरून ॲप डाऊनलोड केले. या तरुणाने गेमिंग पेजवर उपलब्ध असलेल्या तीन पत्ती, कॅसिनो, क्रिकेट आणि फुटबॉलसारखे गेम्स खेळण्यास सुरुवात केली. त्याने २९ मार्च २०२४ ते २ एप्रिल २०२६ या कालावधीत तब्बल ४०० पेक्षा जास्त वेळा पैसे ट्रान्सफर केले आहेत. त्यात त्याने १ कोटी २६ लाख ८६ हजारी ७७८ रुपये गेममध्ये लावले. त्याच्या गेमिंग अकाऊंटमध्ये त्याने जिंकलेल्या रक्कमेमध्ये तब्बल ९० लाख रुपयांची रक्कम दाखवण्यात येत होती. मात्र, त्याला ती काढता येत नव्हती. काही दिवसांनी त्याच्या स्क्रीनवरून ९० लाखांची रक्कमही दिसेनाशी झाली. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्याने पोलिसांत धाव घेतली.

## सराईत गुन्हेगार गजाआड

। पनवेल । प्रतिनिधी ।

खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पार्किंगमधून दुचाकी चोरी करणाऱ्या सराईत चोरट्याला कामोठे पोलिसांनी अटक केली आहे. चेतन कातकर (३४) असे त्याचे नाव असून, त्याने कामोठे व कळंबोली पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील केलेले एकूण चार वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. या गुन्ह्यातील एक दुचाकी पोलिसांनी हस्तगत केली आहे. त्याच्याकडून आणखी काही वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# ''सभागृहातील सभांचे थेट प्रक्षेपण करा''

। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरानध्ये सत्ता स्थापन होऊन पाच महिन्यांचा कालावधी लोटला असून, अद्यापही सभागृहात सर्वसाधारण सभा झालेली नाही. त्यामुळे जनतेच्या समस्या, विकास कामे, प्रलंबित प्रश्न, पर्यटनाच्या वाढीसाठी धोरणात्मक निर्णय याबाबत काही ठोस उपाययोजना करता आलेली नाही. दरम्यान, आज (दि.१५) नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. या महत्वपूर्ण सभेतील विषय जनतेला माहीत व्हावे यासाठी ही सभा थेट प्रक्षेपण द्वारे दाखविण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. जवळपास तीन वर्षांपेक्षा अधिक काळ प्रशासकीय राजवट असल्याने त्या कार्यकाळात जो काही अनागोंदी कारभार सुरू होता. जी कामे पूर्ण करण्यासाठी घाईघाईने प्रयत्न करण्यात आले ती कामे पूर्णपणे निकृष्ठ दर्जाची आणि शासनाच्या पैशाची एकप्रकारे उधळपट्टी झाल्याचे बोलले जात आहे. त्यामध्ये काय गौडबंगाल आहे हे सर्व जनतेच्या निदर्शनास आले पाहिजे. यासाठी ही सर्वसाधारण सभा थेट प्रक्षेपण द्वारे दाखविण्यात यावी अशी मागणी केली आहे.

# कळंब-धनगरवाडी रस्त्याची दुरवस्था

## वाहनचालकांना मोठा धोका

। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील कळंब-धनगरवाडी रस्ता अत्यंत जीर्णावस्थेत असून, जागोजागी मोठंमोठे खड्डे पडले आहेत. रस्त्यावरील खडी निघून गेल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. या मार्गावरून दररोज अनेक वस्तीतील नागरिक प्रवास करत असून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. विशेष म्हणजे, ग्रामपंचायत हद्दीत अनेक विकासकामे सुरू आहेत, नवनवीन बंगल्यांचे बांधकामही सुरू आहे; मात्र, ग्रामस्थांना रस्त्याने प्रवास करताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे. विकासकामे होत असताना मूलभूत सुविधा असलेला रस्ता मात्र दुर्लक्षित राहिल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या तोंडावर रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत. शालेय विद्यार्थी, शेतकरी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना या मार्गावरून प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला वारंवार निवेदन दिले असले तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. स्थानिक ग्रामस्थांनी इशारा दिला आहे की, जर तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही तर मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन छेडले जाईल. प्रशासनाने दुर्लक्ष न करता त्वरित उपाययोजना करावी, अन्यथा अपघातांची जबाबदारी शासनावर टाकली जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



● ( छायाचित्रः गौसखान पठाण)

## तहसीलदारांच्या अनुभवाला कलात्मक रूप | आदिवासींच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवणारा चित्रपट

# चित्रपट महोत्सवात 'सुधागड ०७'ची छाप

विनोद भोईर

। पाली ।

एका महसूल अधिकाऱ्याने वंचित, उपेक्षित आणि शोषित घटकांचे जीवन अनुभवलेल्या अनुभवांना कलात्मक रूप दिले आणि त्यातून 'सुधागड ०७' हा चित्रपट जन्माला आला. सुधागडचे माजी तहसीलदार दिलीप रायण्णावर यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेला हा चित्रपट सध्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये गाजत असून, अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी झालेल्या निवडीमुळे पुन्हा चर्चेत आला आहे.

सन २०१९-२२ या कालावधीत सुधागड तालुक्यात तहसीलदार म्हणून कार्यरत असताना दिलीप रायण्णावर यांनी आदिवासी, कातकरी आणि ग्रामीण समाजाचे जीवन जवळून अनुभवले. दुर्गम वाड्या-वस्त्यांतील नागरिकांचे प्रश्न, शासन योजनांपासून वंचित राहणारे कुटुंब, कोळसा भट्ट्यांवर काम करणाऱ्या मजुरांचे जीवन, दलालांच्या साखळीत अडकलेली कुटुंबे आणि विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर फेकला गेलेला समाज यांचे वास्तव त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. याच अनुभवांनी पुढे 'सुधागड ०७'च्या कथेला आकार दिला. एका बाजूला स्वतःला प्रगत समजणारा समाज आणि दुसऱ्या बाजूला पालावर जीवन जगणारे, शिक्षणापासून वंचित राहिलेले, दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेले कातकरी समाजातील कुटुंब यांच्यातील दरी चित्रपट प्रभावीपणे दाखवतो. तसेच, या चित्रपटात कोळसा भट्ट्यांवरील मजुरी, दलालांचे जाळे, आर्थिक शोषण, व्यसनाधीनता, अज्ञान आणि सामाजिक उपेक्षा यांचे वास्तवदर्शी चित्रण करण्यात आले आहे.

'सुधागड ०७'चे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील स्थानिक कलाकार. सुधागड तालुक्यातील कलाकारांनी साकारलेल्या भूमिका चित्रपटाला अस्सलपणा प्राप्त करून देतात. सध्या हा चित्रमपट विविध चित्रपट महोत्सवांमध्ये प्रदर्शित होत आहे. आतापर्यंत या चित्रपटाने १० पुरस्कारांवर नाव कोरले असून अनेक स्तरांतून त्याचे कौतुक झाले आहे.




> पदार्पणातच दिलीप रायण्णावर यांनी दमदार शड्डू ठोकला असून, सामाजिक वास्तवाला कलात्मक अभिव्यक्ती देणारी ही प्रभावी कलाकृती आहे. 'सुधागड ०७'ला महोत्सवांसह चित्रपटगृहांतही उत्तम प्रतिसाद मिळेल.
> - आलोक जत्राटकर, पीआरओ, शिवाजी विद्यापीठ

### चित्रपटाविषयी थोडक्यात

- चित्रपट : सुधागड ०७
- कालावधी : २ तास ३ मिनिटे
- दिग्दर्शक आणि कथा : दिलीप रायण्णावर
- सुधागडमधील कार्यकाळ : २०१९-२२
- चित्रीकरण : सुधागड (रायगड) व जत (सांगली)
- प्राप्त पुरस्कार : १०
- अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी निवड
- प्रदर्शित होणार : सप्टेंबर २०२६

# सोन्याच्या नावाने भानगड

भारतातील सुवर्णदागिने उद्योगात गेल्या दोन दशकांत काही कंपन्यांनी उल्लेखनीय प्रगती केली. त्यापैकी बेंगळुरूस्थित राजेश एक्स्पोर्ट्स लिमिटेड हे नाव विशेष चर्चेत राहिले. जगातील सर्वात मोठ्या सुवर्णप्रक्रिया आणि दागिने निर्यातदार कंपन्यांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कंपनीने भारतीय उद्योगविश्वात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. मात्र अलीकडील काळात कंपनीच्या आर्थिक व्यवहारांबाबत आणि कर्ज व्यवस्थापनाबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांमुळे 'राजेश एक्स्पोर्ट्स घोटाळा' हा शब्द चर्चेत आला आहे. या प्रकरणाने केवळ गुंतवणूकदारांनाच नव्हे, तर बँकिंग क्षेत्रालाही धक्का दिला आहे. १९८९ मध्ये स्थापन झालेल्या राजेश एक्स्पोर्ट्सने सुरुवातीला सुवर्णदागिन्यांच्या निर्यातीवर भर दिला. पुढे कंपनीने जागतिक बाजारपेठेत विस्तार करत स्वित्झर्लंडमधील सुवर्णशुद्धीकरण उद्योगातही प्रवेश केला. कंपनीच्या महसुलात सातत्याने वाढ होत गेली आणि ती भारतीय शेअर बाजारातील महत्त्वाची कंपनी बनली.सुवर्णाच्या खरेदी-विक्रीचे प्रचंड प्रमाण, जागतिक ग्राहक जाळे आणि मोठ्या उलाढालीमुळे कंपनीचा व्यवसाय भक्कम असल्याचे चित्र निर्माण झाले. अनेक गुंतवणूकदारांनी या कंपनीकडे दीर्घकालीन गुंतवणुकीचा पर्याय म्हणून पाहिले. मात्र २०२४ आणि २०२५ या काळात कंपनीच्या आर्थिक स्थितीबद्दल प्रश्न उपस्थित होऊ लागले. विविध वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या मोठ्या कर्जांची परतफेड वेळेवर होत नसल्याची माहिती समोर आली. काही बँकांनी कंपनीच्या खात्यांना 'स्ट्रेस्ड ॲसेट' म्हणून वर्गीकृत केल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. याच काळात कंपनीशी संबंधित काही कर्जखाती आणि व्यवहारांची चौकशी सुरू झाल्याची माहिती समोर आली. आर्थिक ताळेबंदातील आकडे, रोख प्रवाह (कॅश फ्लो) आणि कर्जाची पातळी याबाबत विश्लेषकांनी प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे शेअर बाजारात कंपनीच्या समभागांवर दबाव वाढू लागलेकंपनीच्या व्यवहारांबाबत अंमलबजावणी संचालनालय (ईडी) तसेच विविध बँकांनी माहिती संकलन सुरू केल्याच्या वृत्तांनी या प्रकरणाला अधिक प्रसिद्धी मिळाली. बँकांकडून दिलेल्या कर्जांचा वापर नेमका कसा झाला, निधीचे हस्तांतरण कोणत्या माध्यमातून झाले आणि आर्थिक अहवालांमध्ये सर्व व्यवहारांची योग्य नोंद झाली होती का, याबाबत तपास सुरू झाला.

## गुंतवणूकदारांचा विश्वास

या चौकशांमुळे 'घोटाळा' हा शब्द माध्यमांमध्ये वापरला जाऊ लागला. तथापि, कोणत्याही आर्थिक प्रकरणात अंतिम न्यायालयीन किंवा अधिकृत निष्कर्ष येईपर्यंत आरोप सिद्ध झालेले मानले जात नाहीत, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.राजेश एक्स्पोर्ट्सच्या समभागांमध्ये दीर्घकाळ गुंतवणूक केलेल्या अनेक गुंतवणूकदारांसाठी ही परिस्थिती धक्कादायक ठरली. कंपनीच्या व्यवसायाचा आकार मोठा असला तरी तिची कर्जफेड क्षमता आणि रोख प्रवाहाबाबत निर्माण झालेल्या शंकांमुळे बाजारातील विश्वास कमी झाला. शेअर बाजारात विश्वास हा सर्वात महत्त्वाचा घटक मानला जातो. जेव्हा एखाद्या कंपनीच्या आर्थिक पारदर्शकतेबद्दल प्रश्न निर्माण होतात, तेव्हा गुंतवणूकदारांचा प्रतिसाद तत्काळ दिसून येतो. राजेश एक्स्पोर्ट्सच्या बाबतीतही हेच घडले. या प्रकरणामुळे सार्वजनिक आणि खासगी बँकांच्या कर्जवाटप प्रक्रियेबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. मोठ्या उद्योगसमूहांना हजारो कोटी रुपयांची कर्जे मंजूर करताना जोखीम मूल्यांकन किती प्रभावीपणे केले जाते, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.गेल्या दशकात भारताने अनेक मोठी आर्थिक प्रकरणे पाहिली आहेत. काही प्रकरणांमध्ये बँकांना मोठे नुकसान सहन करावे लागले. त्यामुळे कर्ज मंजुरी, देखरेख आणि वेळोवेळी होणारे लेखापरीक्षण यांची गरज अधिक अधोरेखित झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, एखाद्या कंपनीची उलाढाल मोठी असली तरी तिची आर्थिक स्थिती सक्षम आहेच असे नाही. व्यवसायातून प्रत्यक्ष निर्माण होणारा रोख प्रवाह आणि कर्जफेड क्षमता हे अधिक महत्त्वाचे निर्देशक असतात.राजेश एक्स्पोर्ट्स प्रकरणाने कॉर्पोरेट गव्हर्नन्स या विषयाकडेही लक्ष वेधले आहे. संचालक मंडळाची भूमिका, स्वतंत्र संचालकांचे निरीक्षण, लेखापरीक्षकांची जबाबदारी आणि गुंतवणूकदारांना दिली जाणारी माहिती या सर्व बाबींचा या संदर्भात पुनर्विचार करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. आधुनिक अर्थव्यवस्थेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व हे उद्योगविश्वाच्या विश्वासार्हतेचे आधारस्तंभ मानले जातात. आर्थिक अहवाल आणि प्रत्यक्ष व्यवहार यामध्ये तफावत आढळल्यास बाजाराचा विश्वास डळमळीत होऊ शकतो. राजेश एक्स्पोर्ट्सविषयी सुरू असलेल्या चौकशांचा अंतिम निष्कर्ष अद्याप समोर आलेला नाही. त्यामुळे या प्रकरणाकडे आरोप आणि प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. जर चौकशीत गंभीर आर्थिक अनियमितता सिद्ध झाल्या, तर संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. उलट, कंपनीकडून योग्य स्पष्टीकरण आणि आर्थिक पुनर्बांधणीचा आराखडा सादर झाल्यास परिस्थिती सुधारण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

## सेबी काय करते आहे?

राजेश एक्स्पोर्ट्स प्रकरण हे केवळ एका कंपनीपुरते मर्यादित नाही. ते भारतीय उद्योगविश्व, बँकिंग क्षेत्र आणि गुंतवणूकदारांच्या विश्वासाशी संबंधित व्यापक प्रश्न उपस्थित करते. मोठ्या उलाढालीच्या कंपन्यांनाही आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची कसोटी द्यावी लागते, हे या प्रकरणाने पुन्हा अधोरेखित केले आहे. सुवर्णव्यवसायातील चमकदार यशकथेमागे आर्थिक व्यवस्थापनातील त्रुटी लपल्या आहेत का, याचे उत्तर आगामी चौकशांमधून स्पष्ट होईल. मात्र या प्रकरणाने एक गोष्ट निश्चित दाखवून दिली आहे. भांडवली बाजारात विश्वास मिळवणे कठीण असते, पण तो गमावण्यासाठी केवळ काही प्रश्नच पुरेसे ठरतात. शेअर बाजार हा कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा आरसा मानला जातो. उद्योग, गुंतवणूकदार आणि वित्तीय संस्था यांना जोडणारा हा महत्त्वाचा दुवा आहे. मात्र ज्या बाजारपेठेचा पाया विश्वासावर उभा असतो, त्याच बाजारात वेळोवेळी घोटाळे उघडकीस येतात आणि गुंतवणूकदारांचा विश्वास डळमळीत होतो. भारतातही गेल्या तीन दशकांत अनेक मोठ्या शेअर बाजार घोटाळ्यांनी आर्थिक व्यवस्थेतील त्रुटी उघड केल्या आहेत. अशा वेळी नियामक संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. १९९२ मधील हर्षद मेहता घोटाळा हा भारतीय भांडवली बाजाराच्या इतिहासातील सर्वात चर्चित आर्थिक घोटाळा मानला जातो. बँकिंग व्यवस्थेतील त्रुटींचा फायदा घेत शेअरच्या किमती कृत्रिमरीत्या वाढविण्यात आल्या. या प्रकरणामुळे बाजारात मोठी उलथापालथ झाली आणि लाखो गुंतवणूकदारांना फटका बसला. त्यानंतर २००१ मध्ये केतन पारेख प्रकरणाने पुन्हा एकदा बाजारातील गैरव्यवहारांचे वास्तव समोर आणले.या घोटाळ्यांमध्ये मुख्यतः शेअरच्या किमतींमध्ये कृत्रिम वाढ करणे, आतील माहितीचा गैरवापर (इनसाइडर ट्रेडिंग), खोटे व्यवहार दाखवणे आणि गुंतवणूकदारांची दिशाभूल करणे अशा प्रकारांचा समावेश होता. आधुनिक तंत्रज्ञानामुळे व्यवहार अधिक वेगवान झाले असले तरी फसवणुकीच्या पद्धतीही अधिक गुंतागुंतीच्या बनल्या आहेत.अशा परिस्थितीत भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ म्हणजेच सेबी ही संस्था भांडवली बाजाराची प्रमुख नियामक म्हणून कार्य करते. १९९२ मध्ये वैधानिक अधिकार प्राप्त झालेल्या सेबीचे प्रमुख उद्दिष्ट गुंतवणूकदारांचे संरक्षण करणे, बाजारातील पारदर्शकता वाढवणे आणि गैरव्यवहारांना आळा घालणे हे आहे.सेबीकडे तपास करण्याचे, दंड आकारण्याचे, व्यवहारांवर निर्बंध घालण्याचे तसेच संशयास्पद आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याचे अधिकार आहेत. हर्षद मेहता प्रकरणानंतर सेबीच्या अधिकारांमध्ये वाढ करण्यात आली. ऑनलाइन व्यवहार, प्रकटीकरणाचे कठोर नियम, इनसाइडर ट्रेडिंगविरोधी तरतुदी आणि सूचीबद्ध कंपन्यांसाठी कडक अनुपालन व्यवस्था यामुळे बाजार अधिक शिस्तबद्ध झाला आहे. तथापि, नियामक संस्थांसमोर अनेक आव्हाने आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, अल्गोरिदमिक ट्रेडिंग आणि जागतिक भांडवली प्रवाह यांच्या युगात आर्थिक गैरव्यवहार अधिक क्लिष्ट स्वरूप धारण करत आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून शेअरच्या किमतींवर प्रभाव टाकण्याचे प्रयत्नही वाढले आहेत. त्यामुळे केवळ नियम बनविणे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक ठरते. तज्ज्ञांच्या मते, गुंतवणूकदारांची आर्थिक साक्षरता वाढवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेक वेळा अवास्तव परताव्याच्या आशेने गुंतवणूकदार अफवा किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवतात. त्यामुळे नियामक संस्थांसोबतच गुंतवणूकदारांनीही सतर्क राहणे गरजेचे आहे. शेअर बाजारातील घोटाळे अर्थव्यवस्थेला धक्का देतात, परंतु त्याचबरोबर व्यवस्थेतील त्रुटी सुधारण्याची संधीही निर्माण करतात. मजबूत नियमन, पारदर्शकता, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि जागरूक गुंतवणूकदार यांच्या साहाय्यानेच भांडवली बाजारावरील विश्वास टिकून राहू शकतो. शेअर बाजाराची खरी ताकद केवळ भांडवल उभारण्यात नसून गुंतवणूकदारांचा विश्वास जपण्यात आहे, आणि त्यासाठी नियामक संस्थांची भूमिका आज पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे.

विचार

# चिंता आणि दिलासा

***गेल्या काही काळामध्ये काही महत्वपूर्ण आर्थिक निरिक्षणे समोर आली. त्यातून महागाईच्या कचाट्यात सापडलेल्या जनतेला काही वेगळे आर्थिक मुद्दे समजून घ्यायला मिळाले. यापैकी पहिले लक्षवेधी अर्थवृत्त म्हणजे भारताला नैसर्गिक वायूचा मोठा साठा सापडणे. दुसरी बातमी म्हणजे शहरी भारतीयांमध्ये आर्थिक चिंतेमुळे तणाव पहायला मिळत आहे. दरम्यान, 'एटीएम'मध्ये रोख रकमेची कमतरता असल्याचे आढळून आले.***



**महेश देशपांडे**

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यात काही महत्वपूर्ण निरिक्षणे समोर आली. त्यातून महागाईच्या कचाट्यात सापडलेल्या जनतेला काही वेगळे आर्थिक मुद्दे समजून घ्यायला मिळाले. यापैकी पहिले लक्षवेधी अर्थवृत्त म्हणजे भारताला नैसर्गिक वायूचा मोठा साठा सापडणे. दुसरी बातमी म्हणजे शहरी भारतीयांमध्ये आर्थिक चिंतेमुळे तणाव पहायला मिळत आहे. दरम्यान, 'एटीएम'मध्ये रोख रकमेची कमतरता असल्याचे आढळून आले.

भारतात नैसर्गिक वायूचा (नॅचरल गॅस) साठा सापडल्याची महत्त्वाची माहिती समोर आली आहे. याआधी भारताचा शेजारी देश पाकिस्तानमध्ये तेल आणि वायूचे साठे सापडल्याच्या बातम्या आल्या होत्या. आता भारताच्या अंदमान समुद्रक्षेत्रातही नैसर्गिक वायूचा मोठा साठा आढळल्याने ऊर्जा क्षेत्रासाठी ही सकारात्मक आणि दिलासादायक बातमी मानली जात आहे. सरकारी मालकीच्या 'ऑइल इंडिया लिमिटेड'ने अंदमान बेटांच्या परिसरातील विजयपूरम-३ या विहिरीत नैसर्गिक वायू सापडल्याची घोषणा केली आहे. कंपनीच्या मते, ही या भागातील दुसरी महत्त्वाची हायड्रोकार्बन (तेल आणि वायू) शोधमोहीम यशस्वी ठरली आहे. विजयपूरम-३ ही विहीर अंदमान बेटसमूहाच्या पूर्व किनाऱ्यापासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर आहे. या ठिकाणी सुमारे ३५५ मीटर खोल समुद्रात ड्रिलिंग करण्यात आले. प्राथमिक तपासणीदरम्यान समुद्रतळाखाली १,९०० मीटरपेक्षा अधिक खोलीवर नैसर्गिक वायूची चिन्हे आढळली. तसेच सातत्याने वायू बाहेर येताना दिसल्याने त्या ठिकाणी वायूचा साठा असल्याची पुष्टी झाली.

'ऑइल इंडिया'ने सांगितले, की हा शोध अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण त्यामुळे अंदमान समुद्रक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर तेल आणि नैसर्गिक वायूचे साठे असण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे; मात्र या साठ्यातून व्यावसायिकदृष्ट्या फायदेशीर उत्पादन करता येईल की नाही, हे अद्याप निश्चित झालेले नाही. यासाठी पुढील काळात अधिक चाचण्या आणि अभ्यास केला जाणार आहेत. सध्या कंपनी वायूचे नमुने तपासत असून त्याची गुणवत्ता, ऊर्जा क्षमता आणि रासायनिक वैशिष्ट्ये यांचा अभ्यास सुरू आहे. तसेच हा वायू कोणत्या भूगर्भीय प्रक्रियेतून निर्माण झाला, याचाही वैज्ञानिक शोध घेत आहेत. विशेष म्हणजे, सप्टेंबर २०२५ मध्ये विजयपूरम-२ या विहिरीत नैसर्गिक वायू आढळल्याची माहिती समोर आली होती. आतापर्यंत या ब्लॉकमध्ये खोदलेल्या तीन विहिरींपैकी दोन विहिरींमध्ये वायूची उपस्थिती आढळली आहे. त्यामुळे अंदमान समुद्र क्षेत्र भारतासाठी भविष्यातील महत्त्वाचे ऊर्जा केंद्र ठरू शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आणखी एक महत्वाचे आर्थिक निरिक्षण म्हणजे शहरांमध्ये राहणाऱ्या अनेक भारतीयांसाठी आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करणे हे तणावाचे मोठे कारण बनत आहे. चांगली बचत, आर्थिक सुरक्षितता आणि भविष्याची तयारी यांची इच्छा असली, तरी त्याच वेळी आरोग्य आणि वैयक्तिक आयुष्यातील समतोल राखणे अनेकांसाठी कठीण होत आहे. 'मणिपासिग्रा हेल्थ इन्शुरन्स' आणि यूगव्ह इंडिया' यांनी तयार केलेल्या 'इंडिया हेल्थ कोशंट,२०२६' अहवालानुसार ४१ टक्के शहरी भारतीयांना आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या प्रयत्नांमुळे तणाव आणि चिंता जाणवते. त्यामुळे आर्थिक चिंता या लोकांच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या प्रमुख कारणांपैकी एक ठरल्या आहेत. या अभ्यासात शारीरिक आरोग्याला ६८ गुण, सामाजिक आरोग्याला ६६ गुण मिळाले, तर आर्थिक स्थितीला १०० पैकी केवळ ६२ गुण मिळाले. या अहवालासाठी देशातील १६ शहरांमधील २,६०० लोकांशी संवाद साधण्यात आला. त्यामध्ये त्यांच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला. अहवालानुसार आर्थिक दबाव हा केवळ बचत किंवा गुंतवणुकीपुरता मर्यादित नाही. सुमारे ३६ टक्के लोकांनी सांगितले, की आरोग्यदायी अन्न, पोषणपूरक उत्पादने आणि नियमित आरोग्य तपासण्यांवरील खर्च त्यांच्या बजेटवर अतिरिक्त ताण निर्माण करतो. तसेच ४० टक्के लोकांचे मत आहे, की तणाव आणि चिंतेचा त्यांच्या शारीरिक आरोग्यावर थेट परिणाम होत आहे. तितक्याच लोकांनी असेही सांगितले, की कुटुंबीय आणि मित्रांसोबत कमी वेळ घालवल्यामुळे त्यांच्या कामावर किंवा शिक्षणावर नकारात्मक परिणाम झाला आहे.

अभ्यासात असेही दिसून आले, की अनेक लोक आपल्या उत्पन्नाबद्दल, बचतीबद्दल आणि भविष्यातील खर्चांबद्दल सतत चिंतेत असतात. या चिंतेचा परिणाम त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर होतो. आरोग्याशी संबंधित गरजा वाढल्यावर त्यासाठी अधिक खर्च करावा लागतो आणि त्यामुळे आर्थिक दबाव आणखी वाढतो. अहवालानुसार, २५ ते ३४ वर्षे वयोगटातील तरुणांवर या समस्येचा सर्वाधिक परिणाम होत आहे. भविष्य सुरक्षित करण्याची धडपड, घरगुती जबाबदाऱ्या आणि वाढते खर्च यांमुळे हा वयोगट अधिक तणाव अनुभवत आहे. महिलांनीही आर्थिक बाबींविषयी अधिक चिंता व्यक्त केली आहे. भविष्यातील खर्च, बचत आणि आर्थिक सुरक्षितता याबाबत अधिक सावध राहण्याची गरज असल्याचे अनेक महिलांचे मत आहे. या अहवालातून स्पष्ट होते, की आजच्या काळात आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे ही अनेक लोकांची सर्वात मोठी प्राथमिकता बनली आहे. अनेकजण शारीरिक किंवा मानसिक आरोग्य सुधारण्यापूर्वी आर्थिक स्थिती मजबूत करण्यावर भर देत आहेत, कारण त्यांच्या मते आर्थिक सुरक्षितता ही चांगल्या आणि स्थिर जीवनाची मूलभूत गरज आहे; मात्र आर्थिक प्रगतीच्या प्रयत्नांसोबत आरोग्य आणि वैयक्तिक आयुष्याचा समतोल राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आणखी एका अर्थवृत्ताने आर्थिक विषयांबाबत सजग असणाऱ्यांचे लक्ष वेधले. देशातील अनेक राज्यांमध्ये 'एटीएम'मध्ये रोख रकमेची कमतरता भासत आहे. 'एटीएम' उद्योगाशी संबंधित 'कॉन्फडरेशन ऑफ एटीएम इंडस्ट्री' या संघटनेने ही समस्या 'इंडियन बँक्स असोसिएशन' आणि रिझर्व्ह बँकेच्या निदर्शनास आणून दिली आहे. संघटनेच्या मते, अनेक 'एटीएम'मध्ये पुरेशी रोकड पोहोचत नसल्यामुळे सेवा विस्कळीत होण्याचा धोका वाढला आहे. विशेषतः ग्रामीण आणि उपनगरांमधील नागरिकांना पैसे काढण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शेतकरी आणि लहान व्यावसायिकांमध्ये चिंता वाढली आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्येही 'एटीएम'मध्ये रोख रक्कम उपलब्ध नसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. देशभरातील अनेक 'एटीएम'मध्ये रोख रकमेची कमतरता जाणवत असून नागरिकांचे म्हणणे आहे, की अनेक यंत्रे पूर्णपणे रिकामी आहेत किंवा त्यामध्ये अत्यंत मर्यादित प्रमाणात रोकड उपलब्ध आहे. उद्योगक्षेत्राशी संबंधित संस्थांच्या मते, ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून सर्वसामान्यांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर तिचा परिणाम होऊ शकतो.

मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये 'एटीएम नेटवर्क'साठी एकूण ९४ हजार कोटी रुपयांच्या रोख रकमेची आवश्यकता होती; मात्र मार्चमध्ये केवळ ६१ हजार कोटी रुपये आणि एप्रिलमध्ये ५४ हजार कोटी रुपयेच उपलब्ध होऊ शकले. मागणी आणि पुरवठा यांमधील वाढलेल्या तफावतीमुळे अनेक भागांतील 'एटीएम' सेवांवर परिणाम झाला आहे. महाराष्ट्रातील हिंगोली, परभणी आणि मराठवाड्यातील काही भागांमध्येही ही समस्या प्रकर्षाने दिसून आली आहे. हिंगोली जिल्ह्यातील वसमत शहरात स्टेट बँक आणि 'बँक ऑफ इंडिया' यांसह अनेक 'एटीएम'मध्ये रोकड उपलब्ध नव्हती. परभणीमध्येही अनेक 'एटीएम'मधील रोकड संपली आणि ती बंद ठेवावी लागली. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. या परिस्थितीचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागाला बसत आहे. खरीप हंगामाच्या पेरणीपूर्वी शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि इतर शेतीकामांसाठी रोख पैशांची गरज असते; मात्र अनेक ठिकाणी 'एटीएम'मधून पैसे मिळत नसल्याने शेतीसंबंधित कामे आणि स्थानिक व्यापारावर परिणाम होत आहे. अनेक राज्यांमधील बँक शाखा आणि 'एटीएम'पर्यंत पुरेशा प्रमाणात रोकड पोहोचत नाही. ग्रामीण आणि उपनगरी भागांमधील रोकड पुरवठा व्यवस्था अधिक मजबूत करण्याची मागणी संघटनेने केली आहे. तसेच या समस्येबाबत रिझर्व्ह बँकेच्या चलन व्यवस्थापन विभागालाही माहिती देण्यात आली आहे. तज्ज्ञांच्या मते, रोकड पुरवठा लवकर सुरळीत न झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था, लहान व्यवसाय आणि कृषी क्षेत्रावर अधिक गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे बँका आणि संबंधित यंत्रणांनी या समस्येवर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

चर्चा आजची

# झुरळांच्या राजकारणाला शरण चिंतेची बाब

**सुयोग आंग्रे**

लोकशाही केवळ सत्तेवर चालत नाही, तर ती लोकांच्या प्रतिकारातून ऊर्जा मिळवते आणि जिवंत राहते. संसदेत बसलेला विरोधक म्हणजे केवळ जागांची संख्या नसून तो जनतेच्या अस्वस्थतेचा, मतभेदाचा आणि संघर्षाचा सामूहिक आवाज आहे. पण भारतीय राजकारणाचा सध्याचा देखावा खोल विरोधाभासाने भरलेला आहे. आज विरोध अस्तित्वात आहे, परंतु प्रतिकार अनुपस्थित आहे. चेहरे आहेत, पण वर्ण नाहीत. आवाज आहे, पण संघर्ष नाही. परिस्थिती अशा टप्प्यावर पोहोचली आहे की, भाजपसारख्या प्रचंड संघटनात्मक आणि वैचारिक शक्तीचा मुकाबला करण्याऐवजी विरोधक आता प्रतीकांच्या, व्हायरल चेहऱ्यांमागे आणि तथाकथित 'झुरळाच्या राजकारणा'च्या मागे धावायला भाग पाडत आहेत.

गंमत म्हणजे, सपा सुप्रिमोने स्वतःच्या सोशल मीडियावर 'भाजप विरुद्ध सीजेपी' असे लिहून हा त्यांचा कमी होत चाललेला आत्मविश्वास आणि वैचारिक दिशाहीनतेचे सार्वजनिक प्रदर्शन आहे. हे त्या मानसिक पराभवाचे प्रतीक आहे ज्यात विरोधी पक्षानेच आता वैचारिक संघर्षाचे केंद्र राहिलेले नाही हे मान्य केले आहे. एकेकाळी भाजपचा सर्वात मोठा प्रतिस्पर्धी म्हणून स्वतःला मांडणारा पक्ष आज प्रेक्षकाच्या भूमिकेत दिसत आहे. हे आत्मविश्वासाचे मानसशास्त्र नाही तर आत्मसमर्पणाचे आहे. ही तीच राजकीय परंपरा आहे, जी एकेकाळी लोहिया यांचा वैचारिक संघर्ष, जयप्रकाश यांचे जनआंदोलन आणि रस्त्यावरील समाजवादी राजकारणासाठी ओळखली जात होती. पण आज त्याच परंपरेचा एक मोठा भाग डिजिटल प्रतीके आणि क्षणिक उत्तेजनांमध्ये कमी झालेला दिसतो. समाजवादी राजकारणात एकेकाळी तळागाळातील संघर्ष असल्याचा दावा केला जात असे. पण आज त्याचा एक मोठा भाग स्टुडिओ-आधारित प्रतिक्रियावादाकडे वळताना दिसतो. खेडे, शेतकरी, विद्यार्थी आणि रस्त्यांच्या राजकारणाची जागा आता ट्रेंड, ट्रोल्स आणि तत्काळ डिजिटल उत्साहाने घेतली आहे. पण आजचा सैफईचा समाजवादाचा ब्रँड वातानुकूलित खोल्या, सोशल मीडियाचा ट्रेंड आणि डिजिटल प्रतीकांपुरता मर्यादित दिसतो. हा 'डिझायनर समाजवाद' आहे. हा घाम नाही, सादरीकरण आहे. यात वैचारिक तपश्चर्या नाही, तर दृश्य अभिनय आहे. लोकशाहीच्या लढ्या पडद्यावर जिंकल्या जात नाहीत, तर रस्त्यावर जिंकल्या जातात. जनादेश ट्विटने नाही तर दृढतेने तयार केला जातो. राजकीय हालचाली 'रील'वर नसून जोखमीवर असतात. त्यामुळे एकेकाळी अशक्य समजल्या जाणाऱ्या पश्चिम बंगालच्या राजकारणात भाजपने स्वत:चे स्थान निर्माण केले. ही परिस्थिती कोणत्याही व्हायरल प्रतीक, डिजिटल उत्साह किंवा क्षणिक राजकीय गोंगाटामुळे निर्माण झालेली नाही. बूथ स्तरावरील संघर्ष, संघटनात्मक विस्तार आणि वैचारिक संयम यांचा हा परिणाम होता. हाच धडा समाजवादी पक्षासह संपूर्ण विरोधकांना समजून घ्यावा लागेल. लोकशाहीच्या लढाया स्टुडिओच्या प्रकाशात जिंकल्या जात नाहीत, तर जमिनीच्या धुळीत जिंकल्या जातात. सत्तापरिवर्तन हा पडद्याच्या तेजातून जन्माला येत नाही, तर संघटना आणि संघर्षाच्या संथ उष्णतेतून होतो. जनआंदोलन हॅशटॅगवर उभ्या नसून धैर्य, जिद्द आणि सततच्या जनसंपर्कावर उभ्या राहतात. आज विरोधकांची सर्वात मोठी समस्या ही आहे की त्यांनी संघर्षाची संस्कृती गमावली आहे. त्याच्याकडे ना रस्त्यावर उतरण्याचा संयम उरला आहे, ना वैचारिक स्पष्टता किंवा व्यापक चळवळीचा पाया बनू शकणाऱ्या लोकांमध्ये विश्वासार्हता. परिणामी, तो काही अदृश्य चमत्कार, काही व्हायरल प्रतीक आणि काही क्षणिक डिजिटल उकळण्यात आपला तारणहार शोधू लागतो. सर्वात दुःखाची गोष्ट म्हणजे विरोधक संघर्षाची भाषा गमावून बसले आहेत. लोहिया यांना काळजी नाही. जेपीकडे नैतिक होकायंत्र नाही. मुलायम सिंह यांच्याकडे रस्त्यावरील फायर पॉवर नाही. आजचे मोठे विरोधक धरणे कमी आणि डिजिटल निदर्शने जास्त करतात. लोकशाही संघर्षाची तयारी करण्यापेक्षा व्हिडिओ गेमची पातळी ओलांडण्याची रणनीती ते बनवत आहेत, असे दिसते. पण लोकशाही हा व्हिडिओ गेम नाही. ही चिखलाची, वाराची आणि मनोधैर्याची लढाई आहे. इथे घाम गाळून आणि संघटना संघर्षातून मार्ग बनवले जातात. इथे वर्षानुवर्षे कोणतेही परिणाम न पाहता टिकून राहावे लागते. लोकशाहीत मीम्स विचारधारेची जागा घेऊ शकत नाहीत. व्यंगचित्र हा चळवळीचा पर्याय होऊ शकत नाही. राजकारण ही केवळ व्हायरल करण्याची कला नाही. लोकांमध्ये विश्वास संपादन करण्याची ही एक दीर्घकालीन प्रथा आहे. संघर्षापासून तुटलेले पक्ष हळूहळू समाजाच्या हृदयाचे ठोकेही तुटतात.

'झुरळाच्या राजकारणासमोर' ही शरणागती म्हणजे खरे तर लोकशाही वृत्तीचा अपमान आहे. कारण लोकशाहीत विरोधी पक्षाची जबाबदारी केवळ सरकारला विरोध करणे नाही तर एक गंभीर आणि विश्वासार्ह पर्याय जनतेसमोर मांडणे ही असते. आज भारतीय लोकशाहीसाठी सर्वात मोठी चिंतेची बाब आहे की विरोधी पक्ष इतका कमकुवत का झाला आहे की त्यांना स्वतःमध्ये एकही नायक दिसत नाही. ही आजच्या विरोधकांची सर्वात मोठी शोकांतिका आहे. भारतीय जनता पक्षाचा पराभव कमी पण वैचारिक शून्यता, संघर्षहीनता आणि नेतृत्वहीनतेमुळे झालेला दिसतो. आणि कदाचित त्यामुळेच आज विरोधकांना सत्तेपुढे स्वतःच्या सावलीची भीती वाटते. कारण ज्याने संघर्ष करण्याची हिंमत गमावली आहे, तो शेवटी सीजेपी सारख्या चिन्हांमध्ये आपला तारणहार शोधू लागतो.

लोकसंसद

## औषधांतील डॉक्टरांच्या कमिशनवर चाप बसायलाच हवा !

रुग्णालयांमध्ये ॲडमिट असलेल्या रुग्णांना औषधे आणि वैद्यकीय साहित्य रुग्णालयाच्याच आत असणाऱ्या अधिकृत मेडिकलमधून खरेदी करण्याची सक्ती करणाऱ्या रुग्णालयांना अन्न व औषध प्रशासन विभागाने मोठा दणका दिला आहे. 'रुग्णालयातील मेडिकलमधूनच औषध खरेदी करणे बंधनकारक नाही. औषधे कुठून खरेदी करायची, हा सर्वस्वी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांचा अधिकार आहे,' असा महत्त्वपूर्ण आदेश एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी जारी केला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी पत्रकार परिषदेत दिला. मुंढे यांच्या या आदेशाचे सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे. रुग्णालयातील डॉक्टर आणि रुग्णालयातील मेडिकल स्टोअर यांचे साटेलोटे असते हे सर्वांनाच ठाऊक आहे. परस्परांच्या आर्थिक संबंधातून डॉक्टरांना मिळणाऱ्या कमिशनला यामुळे चाप बसणार आहे. मात्र डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे किंवा वैद्यकीय साहित्य रुग्णालयाच्या बाहेरील परिसरात असलेल्या मेडिकल स्टोअर्समध्येही उपलब्ध असायला हवीत. बऱ्याचदा डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे ही त्यांनी सांगितलेल्या मेडिकल स्टोअरमध्येच उपलब्ध असतात. अन्य मेडिकल स्टोअरमध्ये त्या औषधात अंतर्भूत असलेल्या घटकांची अन्य कंपनीची औषधे मिळतात मात्र त्याच कंपनीची मिळत नाहीत. अशावेळी औषधे घेण्यासाठी आलेल्या रुग्णाच्या नातेवाईकाची पंचाईत होते. बऱ्याच रुग्णांना किंवा नातेवाईकांना या क्षेत्रातील पुरेसे ज्ञान नसल्याने आणि आपला रुग्ण लवकरात लवकर बरा व्हावा हीच इच्छा असल्याने अधिकचे पैसे गेले तरी चालतील मात्र डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधेच घेऊन जाण्याकडे त्यांचा कल असतो. या संदर्भातही डॉक्टरांना आणि रुग्णालय प्रशासनाला ताकीद देणे गरजेचे आहे.

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

दिनविशेष

# जागतिक पवन दिन

मानव हजारो वर्षांपासून वाऱ्याच्या शक्तीचा वापर करत आहे आणि पवन ऊर्जेचा वापर करत आहे! आजचे आधुनिक तंत्रज्ञान पवन टर्बाइनला अधिक कार्यक्षमतेने या ऊर्जेचे विजेमध्ये रूपांतरित करण्यास अनुमती देते, ज्यामुळे जागतिक पवन दिन साजरा केला जाणारा हा स्वच्छ, नूतनीकरणयोग्य संसाधन तयार होतो.

जागतिक पवन दिन दरवर्षी १५ जून रोजी साजरा केला जातो. याला जागतिक पवन ऊर्जा दिन असेही म्हणतात. युरोपियन विंड एनर्जी असोसिएशनने २००७ मध्ये प्रथमच हा सण साजरा केला, नंतर तो जागतिक पवन ऊर्जा परिषदेच्या सहकार्याने विविध कार्यक्रमांद्वारे जागतिक स्तरावर साजरा करण्यात आला. या दिवशी जगभरातील लोकांना पवन ऊर्जेचे महत्त्व पटवून देण्याचा निर्णय दोन्ही संस्थांकडून घेण्यात आला. युरोपियन विंड एनर्जी असोसिएशन ने २००७ मध्ये पहिल्यांदा हा दिवस साजरा केला. नंतर, ग्लोबल विंड एनर्जी कौन्सिलच्या मदतीने हा दिवस विविध कार्यक्रमांच्या आधारे जागतिक स्तरावर साजरा करण्यात आला. त्यानंतर, २००९ मध्ये, जागतिक स्तरावर साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. या दिवशी लोकांना स्वच्छ हवेचे महत्त्व सांगितले जाईल, असे दोन्ही संस्थांनी ठरवले. या दिवशी वातावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करण्यासाठी लोकांना जागरूक केले जाते. पवन दिनाशी संबंधित कार्यक्रम ७५ हून अधिक देशांमध्ये आयोजित केले जात आहेत. या दिवशी जगभरात पवन ऊर्जेचा दैनंदिन जीवनात वापर करणे, वातावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करणे आणि पवन ऊर्जा उत्पादन क्षेत्रात रोजगाराला चालना देणे यासंबंधी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिवशी लोकांना पवन ऊर्जेचा वापर आणि त्यातून मिळणारे फायदे देखील कळतात. वारा ही निसर्गाची अमर्याद देणगी आहे. याच्या गतिज शक्तीचा वापर करून तयार होणारी पवन ऊर्जा ही अक्षय, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जेचा स्रोत आहे. जीवाश्म इंधनांच्या वापरामुळे निर्माण होणारे हरितगृह वायू, हवामान बदल, आणि पर्यावरणीय आपत्ती यावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता पवन ऊर्जेमध्ये आहे.

आज पवन ऊर्जा केवळ वीज निर्मितीसाठीचा एक पर्याय न राहता, तो आर्थिक विकास, रोजगार निर्मिती आणि ऊर्जा स्वावलंबनाचा एक स्तंभ ठरत आहे. विशेषतः शहरी आणि ग्रामीण भागात पवन प्रकल्पांमुळे स्थानिक रोजगारात वाढ होत असून, ऊर्जा स्वयंपूर्णता साध्य होण्यास मदत होते. जागतिक वारा दिन हे फक्त एक औपचारिक आयोजन नसून, भविष्यातील ऊर्जेच्या सुरक्षिततेसाठीचा जागरूकतेचा संकल्प आहे. आजचा दिवस आपण वाऱ्याच्या शक्तीला मान्यता देऊन, स्वच्छ, हरित आणि टिकाऊ पर्यावरणासाठी एक पाऊल पुढे टाकतो. पवन ऊर्जेमुळे येणाऱ्या नव्या शक्यता, संधी आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने, 'जागतिक वारा दिन' म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर एक परिवर्तनाची सुरुवात आहे. मानवी संस्कृतीच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे पर्यावरणाचा हळूहळू ऱ्हास होत आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे हवामान झपाट्याने बदलत आहे ज्यामुळे मानवी सभ्यता नष्ट होते असे मानले जाते. पवन ऊर्जेच्या क्षमतेला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी १५ जून रोजी जागतिक पवन दिन साजरा केला जातो. पवन दिवस आपली शक्ती आणि जगभरातील ऊर्जा प्रणालींना पुनर्आकार देण्याची क्षमता समोर आणतो. या स्थितीत पाणी, वारा इत्यादी नैसर्गिक अपारंपरिक ऊर्जेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. निसर्गाचा नाश करण्याऐवजी त्याच्या विविध शक्तींचा वापर कसा करता येईल याकडे विज्ञानाची वाटचाल सुरू आहे. वाऱ्याच्या शक्तीबद्दल आणि त्याचा वापर कसा करता येईल याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी जागतिक पवन दिन साजरा केला जातो. इतकेच नाही तर या अपारंपरिक ऊर्जेचा वापर करण्याचे फायदे आणि आतापर्यंत या ऊर्जेचा वापर कसा करायचा याचेही निरीक्षण या दिवसात केले जाते.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ जून

१) श्री. महादेव गणपत म्हात्रे अलिबाग, १५-६-१९४१
२) श्रीम. सरिता शांताराम पाटील अलिबाग, १५-६-१९४०
३) श्री. दत्ताराम भास्कर म्हात्रे अलिबाग, १५-६-१९४६
४) श्री. गजानन शंकर पोपट अलिबाग, १५-६-१९५३
५) संदीप पुरूषोत्तम शहा अलिबाग, १५-६-१९६०
६) श्री. विजय बबन भगत अलिबाग, १५-६-१९६२
७) श्री. मंगेश पद्मनाथ मयेकर अलिबाग, १५-६-१९६४

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल


### आजचे अन्नदाते



कै. लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग



डॉ नुहि जुनैद घट्टे, वाढदिवस अलिबाग



अमृतबेन व प्रेमजी जिवराज जैन, स्मरणार्थ अलिबाग



सौ.उषा अशोक पाटील, अलिबाग

कै. मधुकर काशिनाथ पुणतांबेकर स्मरणार्थ अलिबाग

# माथेरानची राणी समस्येंच्या गर्तेत

## • मर्यादित फेऱ्यांमुळे पर्यटकांचा हिरमोड • पुढल्या हंगामात फेऱ्या वाढविण्याची आशा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नॅरोगेजवर चालणारी नेरळ-माथेरान ही माथेरान येथील पर्यटनस्थळाचा आर्थिक कणा समजली जाते. यंदा अनेक वर्षांनी ही मिनीट्रेन पर्यटकांना चांगली सेवा देणारी ठरली आहे. परंतु, संपूर्ण उन्हाळी हंगाम पर्यटकांची गर्दी वाहून नेणारी मिनीट्रेन हेरिटेज नामांकन कधी मिळवणार? हा प्रश्न कायम आहे. तसेच, मिनिट्रेनचा यंदाचा उन्हाळी हंगाम चांगला गेला असला, तरी ती विविध समस्येंच्या गर्तेत सापडलेली आहे. पर्यटकांना भल्या पहाटेपासून नेरळ स्थानकात तिकिटासाठी ताटकळत उभे राहावे लागते. परंतु, बहुतांश पर्यटकांना मर्यादित फेऱ्या असल्यामुळे तिकिट न मिळाल्यामुळे त्यांचा हिरमोड होत आहे. त्यामुळे माथेरानचा आर्थिक कणा समजल्या जाणारी मिनीट्रेन अनेक समस्यांच्या गर्तेत सपाडली आहे. दरम्यान, आजपासून



माथेरानची राणी पावसळी सुट्टीवर जाणार आहे. त्यामुळे नेरळ-माथेरान मिनिट्रेन पुढील चार महिने बंद राहणर असल्याने पर्यटकांचा आणखीनच हिरमोड झाला आहे.

जगविख्यात पर्यटनस्थळ म्हणून माथेरानची ओळख असल्यामुळे पर्यटक माथेरानला पहिली पसंती देत असतात. एप्रिल आणि मे महिना माथेरान पर्यटन हंगामाचा महत्वाचा महिना असल्याने या महिन्यात पर्यटकांसाठी वेगवेगळ्या स्कीम्स घेऊन हॉटेल व्यावसायिक उतरल्याने माथेरान पर्यटकांच्या सेवेसह सज्ज झाले आहे. शाळांना असलेल्या सुट्ट्या आणि माथेरान मधील थंड हवामान लक्षात घेता आणि मुंबई पासून जवळ असल्याने पर्यटक माथेरानला पसंती देत असतात. त्याचबरोबर जगभरातील पर्यटकांचे आकर्षण असलेल्या नेरळ-माथेरान मिनीट्रेनचा प्रवास माथेरान या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला हवाहवासा वाटत असतो. २१ किलोमीटर अंतर पार करीत असताना ही मिनीट्रेन तब्बल २२० वळणे घेऊन माथेरान येथे पोहचत असते. ८०० मीटर उंचीवर असलेल्या माथेरान शहरात घेऊन जाणारी ही मिनीट्रेन आबालवृद्ध पर्यटकांची आवडती ठरत असते. माथेरान येथे येणाऱ्या प्रत्येक पर्यटकांची मिनीट्रेनमधून प्रवास करण्याची इच्छा असते. मात्र, नेरळ येथून जाणारी मिनिट्रेन येथील मार्गाच्या दुरुस्तीच्या कामासाठी बंद आहे. त्यात गेल्या काही वर्षांपासून मिनीट्रेन सेवेचे ऑनलाईन तिकीट बंद आहे. त्यामुळे पर्यटक नेरळ जंक्शन स्थानकात भल्या पहाटे येऊन गाडीची तिकीट मिळवण्यासाठी प्रयत्न करीत असतात. बहुतांश पर्यटकांना तिकिट न मिळाल्यामुळे त्यांचा हिरमोड होत आहे. त्यामुळे मिनीट्रेनचा प्रवास आणखी सुखकर व्हावा यासाठी गाडीचे डब्बे आणखी आकर्षक करण्याचा प्रयत्न रेल्वेने सुरू केला आहे. नॅरोगेजवर चालणारी नेरळ-माथेरान ही माथेरान येथील पर्यटनस्थळाचा आर्थिक कणा समजली जाते. दरम्यान, यंदा अनेक वर्षांनी ही मिनीट्रेन पर्यटकांना चांगली सेवा देणारी ठरली आहे.

### मिनिट्रेनला हेरिटेज नामांकन नाहीच

नेरळ-माथेरान नॅरोगेज ट्रक या मार्गावरील सर्व स्थानके, मिनीट्रेनच्या दिमतीला असलेली वाफेवर तसेच नव्याने बांधलेली इंजिने आणि माथेरान स्थानक हे हेरिटेज वास्तूत समाविष्ट होणार आहे. त्यासाठी मध्यरेल्वे आणि रेल्वे बोर्ड यांच्याकडून प्रयत्न सुरू आहेत. मिनीट्रेन बरोबर माथेरानचा वारसा सांगणाऱ्या परंपरेला देखील हेरिटेज वास्तूत स्थान देऊन माथेरानला येणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करण्याचे महत्वाचे काम रेल्वे आणि माथेरान गिरिस्थान नगरपरिषद करू पाहत आहे. परंतु, असे असतानाही संपूर्ण उन्हाळी हंगाम पर्यटकांची गर्दी वाहून नेणारी मिनीट्रेन हेरिटेज नामांकन कधी मिळवणार? हा प्रश्न कायम आहे.

# जीवन पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

अनेक वर्षांपासून पेण नगरपरिषदेच्या घंटागाडीवरून स्वच्छता जनजागृतीचे संदेश हिंदी भाषेत प्रसारित केले जात होते. महाराष्ट्राच्या राजभाषेला दुय्यम स्थान मिळत असल्याची बाब लक्षात आणून देत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील निवृत्त अभियंता तथा सामाजिक कार्यकर्ते जीवन शंकर पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. त्यामुळे घंटागाडीवरील हिंदी संदेशांच्या जागी आता मराठी भाषेतील संदेश सुरू करण्यात आले आहेत.




जीवन पाटील यांनी दि.२७ मे रोजी पेण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्षांना लेखी निवेदन देऊन, महाराष्ट्रात नागरिकांशी संवाद साधताना मराठी भाषेलाच प्राधान्य देणे आवश्यक असल्याची ठाम भूमिका मांडली होती. त्याचबरोबर जिल्हाधिकारी रायगड तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनाही ई-मेलद्वारे या विषयाकडे लक्ष वेधण्यात आले होते. पेणसारख्या मराठी भाषिक शहरात स्वच्छता जनजागृतीचे संदेश हिंदीतून दिले जाणे हे स्थानिक नागरिकांच्या भावनांशी विसंगत असल्याचे जीवन पाटील यांनी आपल्या निवेदनात नमूद केले होते.

जनतेपर्यंत पोहोचणारा प्रत्येक संदेश त्यांच्या मातृभाषेत असावा, अशी मागणी त्यांनी केली होती. या मागणीची प्रशासनाने तातडीने दखल घेत हिंदीऐवजी मराठी भाषेतील संदेश प्रसारित करण्यास सुरुवात केली आहे.



# रेल्वे स्टेशन बीट चौकीचे नुतनीकरण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या पनवेल रेल्वे स्टेशन बीट चौकी व परिसराचे सुशोभीकरण करून चौकी नव्याने कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेवकांकडून संयुक्त पाहणी करण्यात आली. या पाहणीनंतर चौकीचे व परिसराचे नूतनीकरणाचे काम येत्या काही दिवसांत सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी पनवेल रेल्वे स्टेशन बीट चौकी व परिसर पाहणीकरिता वपोनि नितीन ठाकरे, गोपनीय विभागाचे अधिकारी शैलेश जाधव, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, शिवानी घरत, प्रियंका कांडपिळे, अस्मिता घरत, माजी नगरसेवक सुनील बहिरा, तेजस कांडपिळे व संजय कदम आदी उपस्थित होते.

# अंबरनाथमध्ये दक्षता पथकाची कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तालुक्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. उसाटणे परिसरातील न्यूओ लॉजिस्टिक पार्क येथे अवैधरित्या साठवून ठेवलेल्या 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल'च्या मोठ्या साठ्यावर राज्य दक्षता पथकाने रविवारी (दि.१४) धडक कारवाई केली. या छाप्यात पथकाने सुमारे १ कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उसाटणे भागातील न्यूओ लॉजिस्टिक पार्क परिसरात असलेल्या राज्यस्तरीय प्लॉट क्रमांक २० च्या समोर काही जण बेकायदेशीर कृत्य करत असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. त्यानुसार दक्षता पथकाने रविवारी तिथे अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान टँकरचे सील तोडून 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल'ची बेकायदेशीर साठवणूक आणि देवाणघेवाण सुरू असल्याचे उघडकीस आले. या छाप्यादरम्यान दोन व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्यावर तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अंबरनाथ आणि परिसरात अवैध इंधनाचा काळाबाजार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास आता पोलीस आणि संबंधित विभाग करत आहे.

# पावसाळ्यापूर्वी घरांना ताडपत्रीचे कवच

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

मान्सून वेळेत दाखल होण्याचा हवामान खात्याचा अंदाज जाहीर झाल्यानंतर रायगड जिल्ह्यात पावसाळी पूर्वतयारीला वेग आला आहे. घरगळती, भिंतींमध्ये झिरपणारी ओल आणि घरातील साहित्याचे नुकसान टाळण्यासाठी नागरिकांकडून घरांवर ताडपत्री टाकण्याची लगबग सुरू झाली आहे.

अलिबाग, मुरूड, रोहा, पेण, पनवेल इत्यादी तालुक्यांतील किनारपट्टी व ग्रामीण भागात कौलारू घरे, पत्र्यांची घरे, गोठे तसेच शेती साहित्य झाकण्यासाठी ताडपत्रीची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. स्थानिक विक्रेत्यांच्या माहितीनुसार,



गेल्या आठवड्याभरात ताडपत्रीच्या विक्रीत सुमारे ६० टक्क्यांनी वाढ झाली आहे. बाजारात ६८, ९१२ आणि १२१५ फूट आकारांच्या ताडपत्रींना सर्वाधिक मागणी असून, ९० ते २०० दर्जाच्या ताडपत्री ३०० रुपयांपासून ते २५०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. निळ्या रंगाच्या सिलपॉलिन ताडपत्रींना ग्राहकांकडून विशेष पसंती दिली जात आहे. हार्डवेअर दुकाने, आठवडी बाजार तसेच रस्त्यांच्या कडेला ताडपत्री विक्रीचे स्टॉल उभे राहू लागले आहेत. ताडपत्रीसोबत बांबू, सुतळी, खिळे आणि दोरखंड यांच्या विक्रीतही वाढ झाली आहे.

# डॉ.शान्ती पटेल यांना अभिवादन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई पोर्टमधील गोदी कामगारांच्यावतीने स्वातंत्र्यसेनानी, माजी खासदार, मुंबईचे माजी महापौर तथा ज्येष्ठ कामगार नेते डॉ. शान्ति पटेल यांचा १२ वा स्मृतिदिन दि.१३ जून रोजी माझगाव येथील कामगार सदनमध्ये पार पडला. मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनच्यावतीने ऑरेंज गेट जवळ वाडीबंदर येथे डॉ. शान्ति पटेल चौकामधील त्यांच्या नामफलकाला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तसेच, कामगार सदनमधील युनियन कार्यालयात देखील त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

स्मृतिदिनानिमित्त झालेल्या सभेमध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष




ॲड. एस.के शेट्ये, जनरल सेक्रेटरी सुधाकर अपराज, कार्याध्यक्ष डॉ. यतीन पटेल, मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे बोर्ड मेंबर प्रदीप नलावडे, युनियनचे सेक्रेटरी विद्याधर राणे, दत्ता खेसे, विजय रणदिवे, खजिनदार विकास नलावडे, उपाध्यक्ष विष्णू पोळ, मारुती विश्वासराव, संघटक चिटणीस मीर निसार युनूस, संदीप चेरफळे, मॅनेजिंग कमिटी मेंबर, सतीश घाडी, गुरुदत्त वाळंज आदी मान्यवरांनी डॉ. शान्ति पटेल यांच्या सामाजिक, राजकीय व कामगार चळवळीतील कार्याच्या आठवणींना उजाळा दिला.

### तरुणी बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

घरातून कोणास काही न सांगता एक तरुणी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



मुस्कान रोशनलाल नौटीयाल (२०) असे या तरूणीचे नाव असनू, तिची उंची ५ फुट ४ इंच, रंग गोरा, केस व डोळे काळे, नाक सरळ, अंगाने सडपातळ, कानात रिंगा, नाकात चमकी असून अंगात डार्क ब्राऊन रंगाचा टी-शर्ट व लाईट ब्राऊन रंगाचा पायजमा, डाव्या हाताच्या मधील बोटा दोन अंगठ्या, तिला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा अवगत आहे.

**ढोल पथकाचा स्वप्नपूर्ती दिवस | रोहा तालुक्यासह जिल्हाभरातून आनंद व्यक्त**

# शिवराज्याभिषेक दिनी मिळाली 'स्फूर्ती'

**। खांब । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा नुकताचा रायगड किल्ल्यावर पार पडला. या सोहळ्यात रोहा तालुक्यातील सुप्रसिद्ध असलेल्या स्फूर्ती प्रतिष्ठान ढोल-ताशा ध्वज पथकाला वादनाची संधी मिळाल्याने हा दिवस त्यांच्यासाठी स्वप्नपूर्ती दिवस ठरला. त्यासाठी तालुक्यासह जिल्हाभरातून आनंद व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे स्फूर्ती प्रतिष्ठान आपल्या कार्याचा दशकपूर्ती सोहळा साजरा करत असतानाच हा बहुमान प्राप्त झाला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून शिवराज्याभिषेक सोहळ्यात रायगड




■ (छायाचित्र : नंदकुमार मरवडे)

जिल्ह्याबाहेरील ढोल-ताशा पथकांना वादनाची संधी दिली जात होती. मात्र, यंदा प्रथमच स्फूर्ती प्रतिष्ठानच्या रूपाने रायगड जिल्ह्यातील पथकाला हा सन्मान मिळाल्याने ही बाब जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरली आहे. शिवराज्याभिषेक दिनाच्या पावन वातावरणात स्फूर्ती प्रतिष्ठानच्या वादकांनी ढोल-ताशांच्या गजरात उपस्थित शिवभक्तांमध्ये उत्साहाचे आणि प्रेरणेचे वातावरण निर्माण केले.

दरम्यान, पुणे येथे झालेल्या शिवराज्याभिषेक राज्यव्यापी बैठकीत मार्गदर्शक युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी गठित केलेल्या समितीच्या आदेशाने स्फूर्ती प्रतिष्ठान ढोल पथकाने आपल्या तयारीचे रणशिंग फुंकले व पथकाचे निमंत्रण पथक प्रमुख सुशिल बामणे यांनी स्वीकारले. गेल्या दोन महिन्यांपासून स्फूर्ती प्रतिष्ठानने ''एकच धून सहा जून'' हे ब्रीद वाक्य आपल्या माथी ठेवत सर्व वादकांनी स्वतःला तयारीसाठी झोकून दिले. यावेळी पथकाचे अध्यक्ष सुमित रिसबूड, पथक प्रमुख सुशिल बामणे, वादक अव्यग्र गोखले, विकी ठमके, किरण मोरे, प्रतीक कांबळे, शुभम दळवी आदींसह इतर सर्व वादकांसह त्यांचे पालक व पथकाचे शुभचिंतक या ऐकतिहासिक क्षणाचे साक्षीदार झाले. या यशाबद्दल राज्याच्या कानाकोपऱ्यातून स्फूर्ती प्रतिष्ठानवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### संपूर्ण जिल्ह्यासाठी गौरवाचा क्षण

स्फूर्ती प्रतिष्ठान गेल्या १० वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरांचे जतन करण्यासाठी कार्यरत आहे. तसेच युवकांमध्ये राष्ट्रप्रेम, संघटनशक्ती आणि संस्कार रुजविण्याचे कार्य सातत्याने करत आहे. त्यामुळे रायगडाच्या भूमीला लाभलेला हा सन्मान संपूर्ण जिल्ह्यासाठी गौरवाचा क्षण असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## निवडक



■ (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

### भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर उपाययोजना

**आगरदांडा :** मुरूड शहरात अनेक पाखाडीत कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असुन, ते नागरिकांसाठी धोकादायक बनत आहेत. हा धोका नागरिकांच्या जीवावर बेतू नये, याकरिता मुरूड जंजिरा नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अलंकापुरी येथे अत्याधुनिक प्राणी नियंत्रण केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. या केंद्राच्या प्रभावी व व्यावसायिक व्यवस्थापनासाठी पुणे येथील नामांकित संस्था पेटफोर्स यांच्याशी करारनामा करण्यात आलेला आहे. या अंतर्गत शहरातील भटके कुत्रे मानवी पद्धतीने पकडून त्यांचे निर्जंतुकीकरण करण्यात येणार असून, आवश्यक त्या वैद्यकीय उपचारांची सोय देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच, सुमारे १०० कुत्र्यांसाठी सुसज्ज आश्रयगृह उभारण्यात आले असून, त्यामध्ये स्वच्छता, अन्न-पाणी व आरोग्याची योग्य काळजी घेतली जाणार आहे. या उपक्रमामुळे कुत्र्यांची अनियंत्रित वाढ रोखणे, नागरिकांच्या सुरक्षेत वाढ करणे व प्राण्यांच्या कल्याणाचीही जपणूक करणे हे उद्दिष्ट साध्य होणार आहे.



■ (छायाचित्र : राजेश डांगळे)

### पनवेलमधील शाळांमध्ये स्वच्छता मोहीम

**पनवेल :** उन्हाळी सुट्टीनंतर दि.१५ जूनपासून शाळांची घंटा पुन्हा एकदा वाजणार आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे स्वागत स्वच्छ आणि सुरक्षित वातावरणात व्हावे यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत सर्व पालिका शाळांमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत शाळांच्या वर्गखोल्या, परिसर, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याच्या टाक्या तसेच खेळाच्या मैदानांची साफसफाई करण्यात आली. शाळांमधील आवश्यक दुरुस्तीची कामेही पूर्ण करण्यात आली असून विद्यार्थ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे.



■ (छायाचित्र : राजेश डांगळे)

### बंधाऱ्यातील पाण्यात मासेमारीची लगबग

**पनवेल :** तालुक्यातील ग्रामीण भागातील बंधाऱ्यांमध्ये साचलेल्या पाण्यात आजही तरुणांकडून पारंपरिक पद्धतीने मासेमारी केली जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. रविवारी (दि.१४) सुट्टीचा दिवस असल्याने अनेक तरुणांनी बंधाऱ्यांवर जाऊन जाळी टाकून मासे पकडण्याचा आनंद लुटला. बंधाऱ्यातील पाण्यात आढळणारे विविध प्रकारचे मासे पकडण्यासाठी तरुण सकाळपासूनच जाळ्या व अन्य साहित्य घेऊन दाखल झाले होते. काही ठिकाणी गटागटाने मासेमारी करताना उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामीण भागातील ही पारंपरिक मासेमारी आजही अनेकांसाठी विरंगुळ्याचे तसेच अतिरिक्त उत्पन्नाचे साधन ठरत आहे. नैसर्गिक वातावरणात वेळ घालवत मासेमारीचा आनंद घेत असलेल्या तरुणांचे चित्र सध्या पनवेलच्या ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.




### लायन्स सरगमचा पदग्रहण सोहळा थाटात

**पनवेल :** लायन्स क्लब ऑफ पनवेलने गेल्या तीन वर्षात केलेले कार्य फारच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन माजी मल्टिपल कौन्सिल चेअरमन संतोष शेट्टी यांनी केले. पनवेल येथील गोखले सभागृहात सरगम लायन्स क्लबच्या नवीन पदग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमात सरगम क्लबचे सन २०२६-२७ चे अध्यक्ष म्हणुन आदित्य दोशी यांनी पदभार स्वीकारला. सरगम क्लबचे मावळते अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा यांनी गेल्यावर्षी केलेल्या कामाचा आढावा घेतला आणि मल्टिपल डिस्ट्रिक्ट तर्फे क्लबला विविध पारितोषिकांनी सन्मानित केल्याचे सांगितले. प्रेमेंद्र बहिरा यांच्यातर्फे गतवर्षी त्यांना सहकार्य केलेल्या सभासदांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात सरगम क्लबमध्ये नवीन सभासद झालेल्या ॲड. सुरेखा भुजबळ, गीतेश नवधरे, किरण पाटील यांना विशेष अतिथी प्रथम प्रांतपाल विजय गणात्रा यांनी सभासदत्वाची शपथ दिली. नवनिर्वाचित अध्यक्ष आदित्य दोशी यांनी अध्यक्ष म्हणुन काम करण्याची संधी दिल्याबद्दल सरगम क्लबच्या सर्व सभासदांचे आभार मानले आणि यावर्षी सुद्धा विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करुन सरगम क्लबची परंपरा पुढे नेणार असल्याचे सांगितले. यावेळी व्यासपीठावर संतोष शेट्टी यांच्यासोबत विशेष अतिथी विजय गणात्रा, रिजन चेअरमन अल्केश शहा आणि झोन चेअरमन नारायण कट्टी हे होते.

## निवडक



### खोरा बंदरात लाटांचा जोर वाढला

**मुरूड :** मुरुड-खोरा बंदरातील समुद्रकिनाऱ्यांवर लाटांचा जोर वाढला असून जोराचे वारे वाहत आहेत. किनाऱ्यावर लाटांचा मारा होत आहे. मात्र, उधाणाच्या मोठ्या भरतीमुळे तालुक्यातील सर्वच समुद्र किनाऱ्यांवर कालपासून समुद्राच्या मोठमोठ्या लाटा उसळू लागल्या आहेत. किनारी भागात वाऱ्याचा वेगही वाढलेला पाहायला मिळाला. दरम्यान, लाटांचा जोर वाढल्याने किनारपट्टीवरील नागरिकांना तसेच पर्यटकांना सतर्कतेचा प्रशासनामार्फत इशारा दिला आहे. पाऊस न पडताच लाटा असल्याने किनारी राहणारे कोळी बांधव व शेतकरी चिंतेत आहेत. जंजिरा व पदामदुर्ग किल्ल्याच्या भिंती १०० फूट उंच असून त्याच्या वरून लाटा उडत असल्याने आश्चर्य होत आहे. लाटांचा प्रभाव वाढल्याने पर्यटकांनी सुरक्षित ठिकाणी राहून पर्यटनाचा आनंद घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. काळपासून समुद्राला उधाण आले आहे. पुढील तीन दिवस किनारपट्टी भागात वादळी वारे आणि वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. पर्यटकांनी व स्थानिक नागरिकांनी समुद्रात पोहण्यास जावु नये तसेच कोळीबांधवानी मच्छिमारी करिता समुद्रात जावू नये असा सतर्कतेचा इशारा प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी ही दिला आहे.




### वाशीत हजारो लिटर पाणी वाया

**पेण :** एकीकडे पेण तालुक्यातील खारेपाट परिसरात नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असताना, दुसरीकडे वाशी येथील सिरिमा हॉटेलसमोर जलवाहिनीची पाईपलाईन फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया गेल्याची घटना समोर आली आहे. स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, पाईपलाईन फुटल्यामुळे सुमारे १,००० लिटरहून अधिक पाणी रस्त्यावर वाहून गेले. आधीच पाण्याच्या कमतरतेने त्रस्त असलेल्या खारेपाट भागातील नागरिकांनी या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जलवाहिनीतील गळतीमुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होत असून संबंधित विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, एका बाजूला पिण्याच्या पाण्यासाठी लोकांना वणवण भटकावे लागत आहे, तर दुसऱ्या बाजूला प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मौल्यवान पाणी वाया जात आहे. त्यामुळे अशा गळतीच्या घटना तातडीने दुरुस्त करून पाणीपुरवठा व्यवस्थेची नियमित देखभाल करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



### कर्जत तालुक्यात आरोग्य शिबीर

**नेरळ :** राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त कर्जत तालुक्यामध्ये अनेक कार्यक्रम आयोजित केले होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि अखिल पोलीस मित्र सुरक्षा परीषद यांच्या संयुक्त विद्यमानाने आरोग्य शिबीर आणि वृक्षारोपण आयोजित करण्यात आले होते. बेकरेवाडी येथे अखिल पोलीस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली व महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित आरोग्य शिबिराचे उद्धाटन महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेना अध्यक्ष जितेंद्र पाटील आणि पोलीस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष किशोर शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे, रतन लोंगले, डॉ. विशाल बनसोडे, प्रा.विजय मोहिते, जैतूबुवा कराळे, नामदेव निरगुडा, रमेश पारधी, गजानन पारधी, बुधाजी पारधी, जयेंद्र निरगुडा, राजेश निरगुडा, आदी उपस्थित होते. यावेळी आरोग्य शिबिरामध्ये बीपी शुगर कोलेस्ट्रॉल रक्ताच्या चाचण्या ईसीजी डोळे तपासणी आणि औषध वाटप करण्यात आले तसेच रक्तदान शिबिर ही घेण्यात आले.या आरोग्य शिबिरासाठी डॉ. दिव्या, डॉ. मयुरी मोहिते, समाधान पाटील यांचे माध्यमातून रुग्णांची तपासणी झाली.

### तहसील कार्यालयातर्फे तोफेची पाहणी

**कोलाड :** रोहे तालुक्यातील शिवशंभो प्रतिष्ठान यांच्याद्वारे भटकंती व शोधमोहीम सुरू असताना अवचितगड रहाल परिसरात शुक्रवारी (दि.१२)जून रोजी तोफ निदर्शनास आली. तद्नंतर शनिवारी (दि.१३) जून रोजी या तोफेची रोहे तहसील महसूल कार्यालय मार्फत पाहणी करण्यात आली.अवचितगड रहाल परिसरात शिवशंभो प्रतिष्ठान यांच्याद्वारे भटकंती प्रसंगी सौरभ घरट, मनोज थिटे, संस्कार घरट, आर्यन काशीद, रोहन शेलार उपस्थित होते. महसूल विभाग तहसील कार्यालय रोहा येथे ही बाब कळाल्यानंतर तहसीलदार देशमुख यांच्या आदेशानुसार मंडळ अधिकारी निडीतर्फे अष्टमी भगवान मोरे, तलाठी मेढा, निलम चंदनशिव, पिंगळसई, वंदना पवार, निडीतर्फे अष्टमी, अंजली मुनेश्वर व महसूल सेवक राजेश काशीद, महेंद्र चोरगे आदी सर्वांनी अवचितागडावर जाऊन तोफेची प्रत्यक्ष पाहणी करुन तोफेची माहिती तहसील कार्यालय रोहा येथे कळवण्यात आली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- दुकानगाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२
- Office staff required Graduates can call for interview. Trainee undergraduates required. Call 9150717038

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माथेरानमध्ये नियमबाह्य जंगलतोड सुरूच

## पर्यावरणदृष्ट्या अत्यंत संवेदनशील क्षेत्र; नियमांना हरताळ फासून बेकायदेशीर बांधकाम

**| नेरळ, मातेरान | प्रतिनिधी |**

माथेरानच्या निसर्गावर घाला घालण्याचे प्रकार काही थांबण्याचे नाव घेत नाहीत. शहरातील अलेक्झांडर पॉइंट भागातील हॉटेल अलेक्झांडरमध्ये वन कायदा, माथेरान नियम या सर्वांची पायमल्ली सुरू आहे. तेथे मोठ्या प्रमाणात अतिरिक्त बांधकाम केले जात असून झाडे प्रचंड प्रमाणात तोडण्यात आली आहेत. दरम्यान माथेरान नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार आणि नगरसेवक सचिन दाभेकर आक्रमक भूमिका घेतली असून संबंधित बांधकामावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी केली आहे.



माथेरान या पर्यावरणदृष्ट्या अत्यंत संवेदनशील व संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. माथेरान हे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित असल्याने येथे नवीन बांधकामास परवानगी नसून केवळ जुन्या संरचनांच्या किरकोळ दुरुस्तीला अत्यंत कडक अटी व शर्तींनुसार परवानगी दिली जाते. अशा परिस्थितीत मॉनिटरिंग कमिटी व हेरिटेज कमिटीची आवश्यक मंजुरी न घेता अलेक्झांडर हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. माथेरानमध्ये नियमांना हरताळ फासून बेकायदेशीर बांधकाम सुरू असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. येथील भूखंड क्रमांक एम पी ९९ या अलेक्झांडर हॉटेलमध्ये मॉनिटरिंग कमिटी (सनियंत्रण समिती) आणि हेरिटेज कमिटीच्या पूर्वपरवानगीशिवाय अतिरिक्त व अनियमित बांधकाम सुरू आहेत. अशी लेखी तक्रार विरोधी पक्षनेते कुंभार आणि नगरसेवक दाभेकर यांनी माथेरान नगरपरिषदेकडे दिली आहे.

कुंभार यांच्याकडून करण्यात आलेल्या तक्रारीनुसार थेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी दिनांक २६ सप्टेंबर २०२५ अन्वये किरकोळ दुरुस्तीची परवानगी दिली. मात्र, ही परवानगी देताना मॉनिटरिंग कमिटी किंवा हेरिटेज कमिटीची मंजुरी घेण्यात आली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित परवानगीचा आधार घेत पावसाळ्यानंतर करण्यात येणाऱ्या किरकोळ दुरुस्तीच्या नावाखाली नवीन खोल्या वाढविण्याची तयारी सुरू असून प्रत्यक्षात अतिरिक्त बांधकाम करण्यात येत असून त्याची मुदत ही संपले आहे आणि तरीदेखील बांधकामे सुरू आहेत.

> **नियमांचे उल्लंघन**
> हॉटेल परिसरात अनधिकृतपणे झाडे तोडण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अलेक्झांडर हॉटेल परिसरालगत जंगल क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे मोठे तंबू (टेंट) उभारण्यात आल्याने पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन झाले आहे.

> “अलेक्झांडर हॉटेल येथील बांधकाम त्वरित थांबवून ते तोडून टाकण्यात यावे तसेच या बांधकामाला आणि जंगलातील झाडे तोडणाऱ्या हॉटेल मालकावर गुन्हा दाखल करावा.
> -सीताराम कुंभार
> विरोधी पक्षनेते”

# पर्यावरणप्रेमींचा झाडे तोडण्यावर आक्षेप

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील पालीतर्फे कोतवाल खलाटी ग्रामस्थांचा विरोध असताना देखील पाली साई डोंगर येथे टोरंट कंपनीकडून येथील जमिनीवर अतिक्रमण कायम ठेवले आहे. वन विभागाने आपली जमीन धरणे बांधण्यास देण्याचा निर्णय घेतला असल्याने त्या जमिनी वर असलेली २०० वर्षे जुनी झाडे तोडण्यास सुरुवात झाली आहे. दरम्यान जंगलातील झाडे तोडण्यास स्थानिक पर्यावरण प्रेमींनी विरोध केला असून तेथील जंगलात लावलेल्या आगी बद्दल देखील संताप व्यक्त केला आहे.



अनेक ठिकाणी रद्द करण्यात आलेला टोरंट जलविद्युत प्रकल्प कर्जत तालुक्याच्या मानगुटीवर बसवण्यात आला आहे. या प्रकल्पाला सर्वबाजूंनी विरोध केला जात असून स्थानिक पालीतर्फे कोतवाल खलाटी ही ग्रामपंचायत पूर्णपणे धरणाच्या विरोधात आहे. तरीदेखील शासनाच्या हस्तक्षेप आणि शासनाचा छुपा पाठिंबा यामुळे टोरंट कंपनील बळ मिळाले आहे.

कंपनीला वन विभागाने ६४० एकर जमीन दिली असल्याचे स्थानिक पातळीवर बोलले जात आहे.त्यानंतर त्या जमिनी मधील जुनी झाडे नष्ट करण्याचे कारस्थान टोरंट कंपनीकडून सुरू आहे. त्यात आता १०० ते २०० वयोमान असलेली जुनी झाडे तोडण्याचे काम सुरू झाले आहे. झाडे स्थानिकांच्या डोळ्यासमोर तोडली जात असून वन विभागाच्या क्षेत्रातील ही झाडे तोडली जात असताना वन विभागाचा एकही कर्मचारी त्या ठिकाणी जाऊन आक्षेप घेत नसल्याने स्थानिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत.

# नवीन पनवेलच्या वीज जाळ्याला बळकटी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नविन पनवेल शहरातील वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर महावितरणने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. धनंजय औढेकर, कार्यकारी संचालक यांच्या आदेशानुसार तसेच संजय पाटील, मुख्य अभियंता, भांडुप परिमंडळ, दीपक पाटील, अधीक्षक अभियंता, वाशी मंडळ, आणि जितेंद्र माने, कार्यकारी अभियंता, पनवेल शहर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली धनंजय सातपुते, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, पनवेल सिटी उपविभाग यांनी सेक्टर-१५ येथील ३३/११ केव्ही उपकेंद्रात १० एमव्हीए क्षमतेचा नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्याचे काम यशस्वीरित्या पूर्ण केले.

पनवेल शहरातील सेक्टर-७ व सेक्टर-१५ या दोन्ही उपकेंद्रांमधील विद्यमान पॉवर ट्रान्सफॉर्मरवर वाढत्या भारामुळे ओव्हरलोडची परिस्थिती निर्माण झाली होती. यावर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून सेक्टर-१५ उपकेंद्रात नवीन १० पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवून तो यशस्वीरित्या चार्ज करण्यात आला आहे.



# उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप

**| माणगाव | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा ५८ वा वाढदिवस रविवारी (दि. १४) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राज पार्टे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव तालुका मनसेतर्फे उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथील रुग्णांना फळ वाटप करून साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्वांनी राज ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सुरुवातीला दक्षिण रायगड मध्यवर्ती कार्यालय, मोर्बा रोड, माणगाव या पक्षाच्या कार्यालयात तालुकाध्यक्ष चिमण सुगदरे यांच्याहस्ते केक कापण्यात आला. त्यानंतर माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळे व बिस्किटांचे वाटप केले. या कार्यक्रमास पक्षाचे माणगाव तालुकाध्यक्ष चिमण सुगदरे, वैभव गंडागळे, शैलेश शिंदे, गोपाळ पवार, अक्षय केकाणे, दर्शन करकरे, हरेश सकपाळ, केतन गोरेगावकर, संतोष गवसकर, ज्ञानेश्वर जाधव, रोहित सुर्वे, यज्ञेश भोसले आदी उपस्थित होते.

# ऐनघर ग्रा.पं.च्या घंटागाडीचे उद्घाटन

**सुकेळी :** रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत ऐनघरच्या वतीने ग्रामपंचायत हद्दीतील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी व शिस्तबद्ध पद्धतीने करण्यासाठी नवीन घंटागाडी खरेदी करण्यात आली आहे. या घंटागाडीचे उद्घाटन शुक्रवारी (दि. १२) ग्रुप ग्रामपंचायत ऐनघरच्या सरपंच कलावती कोकळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामसेवक गोविंद शिद, प्रकाश डोबळे, सचिन भोसले, विठ्ठल इंदुलकर, यशवंत शिद, संतोष कनघरे, प्रभाकर उमासरे, महादेव भोईर, तुकाराम शिरसे, राजेंद्र कोकळे, राम तेलंगे, राजेंद्र जाधव आणि इतर ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या या स्तुत्य उपक्रमाचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात आले आहे.

# पावसाळ्यातील रानभाज्या खवय्यांसाठी पर्वणी

**| माणगाव | प्रतिनिधी |**

पावसाळा म्हणजे रानभाज्यांची पर्वणी असते. काही भाज्या पावसाळ्यापूर्वी उगवतात तर काही भाज्या ह्या पावसाळ्यात उगवतात. शेवळं, कुडा, आकुड, टाकला इत्यादी रानभाज्या पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यात उगवतात. या रानभाज्या खायला चवदार व पौष्टिक असे औषधी व गुणकारी असतात. त्यामुळे या रानभाज्यांना पावसाळ्यात खवय्यांची मोठी मागणी असते. या रानभाज्यांची खवय्ये आतुरतेने वाट पाहत असतात. या भाज्या बाजारपेठेत दाखल झाल्यावर खवय्ये आवर्जून या भाज्या विकत घेत असतात.



गेल्या काही दिवसांपासून रानातील रान भाज्यांना बहर आला आहे. जिल्ह्यातील बाजारपेठेत रान भाज्या मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी येत असून रानभाज्याना मोठी मागणी आहे. पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यात रानात कुडा, शेवल, आकुड, टाकला इत्यादी रानभाज्या मोठ्या प्रमाणात उगवतात. या रानभाज्या खायला चविष्ट व पौष्टीक असतात. पावसापूर्वी ऋतूत येणाऱ्या या भाज्या खवय्यांच्या पसंतीच्या असून या ऋतूत या भाज्यांना चांगली मागणी आहे. रानभाज्या उगवल्या असून पावसाळा वाढत जाईल तशा अनेक भाज्या तयार होणार आहेत. आदिवासी स्त्रिया रानावणात फिरून सदर भाज्या मिळवतात. या भाज्या विकून त्यांना रोजगार मिळत असून आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध होत आहे. साधारण २० ते १०० रुपयांपर्यंत या भाज्या विकल्या जातात. आवक वाढेल तशी दहा रुपये प्रति जुडी मिळेल. पावसाळ्यात मिळणाऱ्या या भाज्या खरेदी करण्यासाठी प्रवासी व नागरिक आवर्जून थांबून सदर भाज्या खरेदी करत आहेत. या भाज्या विशेष प्रकारचे संस्कार करून शिजवाव्या लागतात. काही भाज्या उकडून शिजवून घ्याव्या लागतात. काही भाज्यांमध्ये विशिष्ट प्रकारचा झाड पाला मिसळावा लागतो म्हणजे या भाज्या खायला चवदार लागतात व बाधत नाहीत.

# मुख्यमंत्री पंचायत राजमध्ये महागावचा डंका

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र शासनाच्या पंचायत राज विभागांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री पंचायत राज अभियान २०२५-२६ मध्ये रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत महागावने अत्यंत मानाचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे. या घवघवीत यशामुळे संपूर्ण परिसरामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ही कामगिरी सर्व ग्रामस्थांसाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.

ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात राबवण्यात आलेल्या विविध लोककल्याणकारी योजना, पारदर्शक कारभार, स्वच्छता मोहीम आणि




पायाभूत सुविधांचा विकास या सर्व आघाड्यांवर महागाव ग्रामपंचायतीने उत्कृष्ट कामगिरी केली. मुख्यमंत्र्यांच्या या विशेष अभियानात ग्रामपंचायतीला मिळालेले हे यश म्हणजे गावातील लोकसहभाग आणि उत्कृष्ट नियोजनाचे फलित मानले जात आहे.

ग्रामपंचायत महागावने मिळवलेल्या या ऐतिहासिक यशामध्ये गावाचे सरपंच, सर्व सन्माननीय सदस्य, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी आणि गावातील प्रत्येक नागरिकाचे मोलाचे योगदान लाभले आहे. अभियानादरम्यान या सर्वांनी घेतलेल्या विशेष परिश्रमांमुळेच गावाला हा बहुमान प्राप्त झाला आहे. या यशाबद्दल सामाजिक कार्यकर्ते गणेश चोरगे यांनी ग्रामसेवक, सरपंच, सर्व सदस्य, कर्मचारी आणि समस्त महागाव ग्रामस्थांचे मनापासून हार्दिक अभिनंदन केले आहे. जिल्हा परिषद अलिबाग-रायगड यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने हे सन्मानपत्र देऊन ग्रामपंचायतीचा गौरव करण्यात आला आहे. महागाव ग्रामपंचायतीचा हा आदर्श इतर गावांनाही प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात असून ग्रामपंचायतीच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी आणि भावी उपक्रमांसाठी सर्व स्तरांतून हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# शैक्षणिक खर्चाने पालक चिंतेत

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात सोमवारी (दि. १५) जूनला होत असल्याने पनवेल शहरातील पुस्तक विक्रेते, स्टेशनरी दुकाने आणि शैक्षणिक साहित्य केंद्रांमध्ये रविवारी दिवसभर पालक व विद्यार्थ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. नवीन पुस्तके, वह्या, दप्तर आणि अन्य शालेय साहित्य खरेदीसाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर दुकाने गाठली. दरम्यान, शिक्षणाचा वाढता खर्च हा पालकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

पुस्तकांचे संच, वह्या, गणवेश आणि इतर शालेय साहित्याच्या किमती वाढल्याने अनेक कुटुंबांचे मासिक बजेट कोलमडले असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. तरीही आपल्या मुला-मुलींना उत्तम शिक्षण मिळावे यासाठी पालक सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे चित्र दिसून आले. खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक पालकांनी सेकंड हॅन्ड पुस्तकांचा पर्याय निवडला. काही पुस्तक विक्री केंद्रांवर जुन्या पुस्तकांच्या खरेदी-विक्रीलाही चांगला प्रतिसाद मिळाला. शिक्षण महाग होत असले तरी मुलांच्या भविष्यासाठी आवश्यक असलेली ही गुंतवणूक असल्याचे पालकांनी सांगितले. काही पालकांनी शिक्षण क्षेत्राकडे केवळ व्यवसाय म्हणून न पाहता देशाचे भविष्य घडविणारे माध्यम म्हणून पाहण्याची गरज व्यक्त केली.

मोहीम यशस्वी करण्यासाठी विभागाचे नियोजन | शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे मुख्य ध्येय

# ‘पशुपालकांनी मान्सूनपूर्व लसीकरण करून घ्या’

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली आहे. राज्यात ममान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीमम आता युद्धपातळीवर व मोहीम स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. राज्यातील पशुधनाचे आरोग्य राखणे व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हे आपले मुख्य ध्येय असून, निश्चित केलेल्या लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या शंभर टक्के पूर्तीसाठी विभागाने काटेकोर नियोजन केले असून या मोहिमेत



सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

पावसाळ्यापूर्वी होणाऱ्या घटसर्प व फऱ्या यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी लसीची गुणवत्ता टिकून राहणे अत्यंत महत्त्वाचे असते. लसीचा प्रभाव उत्तम राहण्यासाठी शीतसाखळी व्यवस्थापन अत्यंत चोख ठेवण्यात आले आहे. राज्यस्तरापासून ते थेट ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत लस पोहोचवताना आवश्यक तापमान राखले जाईल, यासाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात आहे.

मोहीम यशस्वी करण्यासाठी विभागामार्फत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत जिल्हा व तालुका पातळीवर आवश्यकतेनुसार लसींचा पुरेसा साठा आधीच वितरित करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली असून, ती प्रत्यक्ष गावागावांत व गोठ्यांपर्यंत पोहोचून मडोअर स्टेपफ पद्धतीने लस टोचणी करत आहेत. एकाही जनावराचे लसीकरण सुटणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

> “पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व संसर्ग पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ऐनवेळी येणारे संकट आणि होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी आपल्या गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करून घ्यावे. यासाठी शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.
> -डॉ. किरण पाटील”

# पाताळगंगाला विषारी रसायनांचा विळखा

## पत्रकारांकडून आंदोलनाचा इशारा



| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिकीकरणाने नटलेला परिसर आहे. या परिसरात कारखानदारी वाढत असताना औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीने नाल्यामध्ये कोणतीही प्रक्रिया न केलेले विषारी रासायनिक सांडपाणी सोडल्याचा भयंकर प्रकार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. या नाल्यातून हे विषारी पाणी थेट पाताळगंगा नदीत मिसळल्याने संपूर्ण नदी प्रदूषित झाली असून, परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याअगोदरही दुसऱ्या जिल्हातील विषारी रसायने पाताळगंगा नदीत आणून सोडत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे असा प्रकार सुरू असताना संबंधित यंत्रणा मुक गिळून शांत का? अशी चर्चा सुरू आहे. याविरोधात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

पाताळगंगा एमआयडीसी हद्दीतून वाहणाऱ्या मुख्य नाल्यातून उग्र वास मारणारे आणि रंगीत रासायनिक पाणी वाहताना स्थानिकांच्या तसेच आदीवासी बांधवांचा निदर्शनास आले. हेच दूषित सांडपाणी पुढे जाऊन पाताळगंगा नदीच्या पात्रात मिसळत आहे. पाताळगंगा नदीवर आजूबाजूच्या अनेक गावांच्या आणि वाड्यांच्या पिण्याच्या पाण्याचे स्रोत अवलंबून आहेत. या विषारी रसायनांमुळे नदीतील जलचरांच्या (माशांच्या) जिवालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, पाताळगंगा एमआयडीसीमध्ये रात्रीच्या अंधारात किंवा सुट्टीच्या दिवशी नाल्यात रासायनिक सांडपाणी सोडण्याचे प्रकार गेल्या काही वर्षांपासून सातत्याने घडत असल्याचे नागरिक सांगत आहे. मात्र, वारंवार अशा घटना घडूनही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी झोपलेलेच आहेत का? सिईटीपी यंत्रणा, नदी संवर्धन संस्था गेल्या कुठे, असा संतप्त सवाल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी उपस्थित केला आहे. तसेच, प्रदूषण करणाऱ्या संबंधित कंपन्यांवर कडक आणि फौजदारी कारवाई न झाल्यास प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विरोधात रायगड जिल्ह्यातील पत्रकार आंदोलन करतील, असा इशारा देखील जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी दिला आहे.

निसर्गाचा आणि नदीचा असा ऱ्हास होत असताना प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. आता तरी एमपीसीबीचे वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधित अज्ञात कंपनीचा शोध घेणार का? आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करून् पाताळगंगा नदीला विनाशापासून वाचवणार का? याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागून राहिले आहे.

# बंद वाहनामुळे अपघाताचा धोका



| पाताळगंगा | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यातील सावरोली-खारपाडा मार्गावरील लोहप गावानजीक रस्त्याच्या मध्यभागी एक जड वाहन बंद पडले असून, तब्बल २४ तास उलटूनही ते हटविण्यात आलेले नाही. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या मार्गाचे काम काही वर्षांपूर्वी उत्तम दर्जाचे करण्यात आल्याने वाहनांचा वेग वाढला आहे. मात्र, रस्त्याच्या मध्यभागी उभ्या असलेल्या बंद वाहनामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे या वाहनाजवळ कोणत्याही प्रकारचे बॅरिकेड, रिफ्लेक्टर, इशारा फलक किंवा वाहन बंद पडल्याचे दर्शविणारी सुरक्षा व्यवस्था करण्यात आलेली नाही. विशेषतः रात्रीच्या वेळी अपुरा प्रकाश आणि कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने वाहनचालकांना बंद वाहनाचा अंदाज येणे कठीण होत आहे. त्यामुळे मोठा अपघात होण्याची दाट शक्यता नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या मार्गावर वाहनचालकांकडून वारंवार ओव्हरटेक केले जाते. तसेच, अनेक वाहने कच्चा व पक्का माल मोठ्या प्रमाणात वाहून नेत असल्याने वाहतूक अधिक धोकादायक बनली आहे.

# पुन्हा येतोय इपितर फेम "आर्थिंग्या"




| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

मराठी प्रेक्षकांच्या मनात विशेष घर केलेल्या 'इपितर' या चित्रपटातील अत्यंत लोकप्रिय आणि लाडके पात्र 'आर्थिंग्या' आता नव्या वेबसीरिजच्या माध्यमातून पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटात आर्थिंग्याची मुख्य भूमिका साकारणारे तसेच टाईमपास चित्रपटातील मलेरिया दादूस फेम अभिनेते जयेश चव्हाण यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ही घोषणा केली आहे. त्यामुळे त्यांच्या चाहत्यांना एक सुखद धक्का मिळाला आहे.

'इपितर' चित्रपटातील आर्थिंग्या या पात्राला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले होते. त्याची निरागसता, खुसखुशीत संवादफेक आणि आगळीवेगळी विनोदशैली आजही प्रेक्षकांच्या चांगलीच स्मरणात आहे. आता हेच बहुचर्चित पात्र एका नव्या रंजक कथानकासह आणि नव्या स्वरूपात वेबसीरिजच्या माध्यमातून प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाले आहे. विशेष म्हणजे, हे मुख्य पात्र साकारणारे अभिनेते जयेश चव्हाण हे रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील रहिवासी असल्याने या निमित्ताने रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या नव्या आगामी वेबसीरिजची निर्मिती गोल्डन एरा स्टुडिओज करत आहे. या भव्य प्रकल्पासाठी सध्या ऑनलाईन ऑडिशनलाही सुरुवात करण्यात आली आहे. या वेबसीरिजच्या माध्यमातून नवोदित तसेच अनुभवी स्थानिक कलाकारांना अभिनयाची मोठी संधी उपलब्ध करून दिली जात असून, इच्छुक कलाकारांकडून ऑडिशन मागविण्यात येत आहेत.

# जेएनपीएची भारतातील सर्वोत्तम कामगिरी



| उरण | प्रतिनिधी |

भारताचे सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने पुन्हा एकदा देशाचा झेंडा जागतिक स्तरावर उंचावला आहे. जागतिक बँक आणि एस अँड पी ग्लोबल मार्केट इंटेलिजन्स यांनी जाहीर केलेल्या कंटेनर पोर्ट परफॉर्मन्स इंडेक्स २०२५ मध्ये जेएनपीएने जागतिक स्तरावर २२वे स्थान पटकावत भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर म्हणून आपली ओळख कायम राखली आहे.

विशेष म्हणजे २०२०-२५ या पाच वर्षांच्या कालावधीत सर्वाधिक सुधारणा करणाऱ्या जगातील अव्वल २० बंदरांमध्ये जेएनपीएने १४वे स्थान मिळवले आहे. या कालावधीत जेएनपीएच्या कामगिरीत लक्षणीय वाढ झाली असून, जागतिक बंदर क्षेत्रात त्याची विश्वासार्हता आणि कार्यक्षमता अधिक मजबूत झाली आहे. सीपीपीआय २०२५ अहवालानुसार, जेएनपीएने बंदराच्या एकूण कार्यकालापैकी ७५ टक्के बर्थ ऑक्युपन्सी नोंदवली आहे. तसेच स्टॅटिस्टिकल इंडेक्समध्ये ५८.९ आणि प्रशासकीय इंडेक्समध्ये १३८ गुण मिळवत जागतिक क्रमवारीत २२वे स्थान मिळवले आहे. गेल्या पाच वर्षांत जेएनपीएच्या गुणांकनात तब्बल ३२ गुणांची वाढ झाली आहे. २०२० मध्ये ६६ गुण असलेले जेएनपीए २०२५ मध्ये ९८ गुणांपर्यंत पोहोचले आहे. यामुळे जागतिक स्तरावर सर्वाधिक प्रगती करणाऱ्या बंदरांमध्ये जेएनपीएची गणना होऊ लागली आहे. देशातील सर्वात मोठे कंटेनर बंदर म्हणून जेएनपीए आता क्षमता विस्तार, अत्याधुनिक तंत्रज्ञान, लॉजिस्टिक्स सक्षमीकरण आणि शाश्वत विकासाच्या बळावर आणखी मोठी झेप घेण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,
मौजे शिंगढोळ ता- कर्जत, जि- रायगड येथील शेतजमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक प्रियंका मनोज ओसवाल रा- कोठिंबे ता- कर्जत, जि- रायगड याची खालील वर्णन केलेली जमीन मिळकतीचे वर्णन

| सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | १८ | एकुण क्षेत्र - १.४८.०० हे. आर. पॉ. पैकी विकत देणार यांच्या मालकीचे विकत देत असलेले क्षेत्र - ०.८४.०० हे. आर. पॉ | ०.४२ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक यांनी आमचे आशिलास सदर मिळकत कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन एकवीस (२१) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक १५/०६/२०२६

ॲड. भारत अंकुश सावंत
(बी कॉम. एल. एल. बी)
पत्ता- मु. पो. मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. योगेश विठोबा मोरे, रा. हमरापूर, पो. जोहे, ता. पेण, जि. रायगड ४०२१०७ यांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत मिळकतीच्या विद्यमान मालकाकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे माझे अशिलांचे सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांचे बरोबर आर्थिक व्यवहार झालेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे जिर्णे, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत.**

| क्र. | मालकाचे नाव | स.नं. /गट नं. | क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पांडुरंग गोपाळ महाबळे | २८ | ०.१०.४० पो.ख. ०.००.५० एकूण ०.१०.९० | ०.९४ |

तरी सदर जमीन मिळकती बाबत कोणाचाही विक्री, साठेकरार, गहाण, दान, बक्षीस, वारसा हक्क, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, लिज, लिन जामिनकी, कुळहक्क, भाडेपट्टा, कुळमुखत्यारपत्र, कोर्ट मॅटर, मृत्युपत्र अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत खाली सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. सदर मुदतीत कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास मिळकतीत कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे गृहीत धरून व मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून मिळकती बाबत खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळविले.

पेण. सही/-
दि. १५/०६/२०२६

ॲड. श्री. आर. आर. म्हात्रे
परमार प्लाझा, पेण पोलीस स्टेशन जवळ
गाळा नं. ०९, ता. पेण, जिल्हा-रायगड
मोबा. ९४२२६८९५९८/७३५०८११०५५

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेंत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव बामणसुरे येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकती श्री. दिपम जयंतीभाई पटेल यांचे मालकीच्या असून, आमचे अशिलांची सदर मिळकती विकत घेण्याबाबत मिळकतीचे मालकांबरोबर बोलणी चालू आहेत.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र आर.चौ.मी | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३२ | - | २९-१०-०० | २९१=०० |
| ३३ | - | ११-६०-०० | ११६=०० |
| ३४ | - | ०६-००-०० | ६०=०० |

तसेच सदर गट नंबर ३२, ३३ व ३४ या मिळकतीमध्ये येण्या जाण्याकरिता गांव बामणसुरे येथील गट नंबर ३१, हिस्सा नंबर १ या मिळकतीमधून ६० मीटर रूंद व ४०.० मीटर लांबीचा वहिवाटीचा रस्ता असल्याचे श्री. दिपम जयंतीभाई पटेल यांनी आमचे अशिलांस सांगितले आहे. तरी, गट क्रमांक ३२, ३३ व ३४ या मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यावर नांव असणाऱ्या मालकाव्यतिरिक्त आणि मौजे बामणसुरे येथील गट नंबर ३१, हिस्सा नंबर १ या मिळकतीमधून ६० मीटर रूंद व ४०० मीटर लांबीच्या वहिवाटीच्या रस्त्याबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास आणि वर नमूद केलेल्या जमिनीच्या प्रस्तावित व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही स्वरूपाची हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत नोंदवावी. त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

तारीख: १५/०६/२०२६ सही/-

ॲड. संजीव अनिल घरत
मु. पो. खंडाळे,
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.
मोबाईल: ९९२१५५२६७७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खाली तक्त्यात नमुद केलेली बिनशेती जमिन मिळकत माझे अशिलांनी सदर मिळकतीचे मालक अथर्व सुब्रामानैम, अनुराग वेंकटेश गोडबोले आणि अभिषेक पद्मनाभ गोडबोले यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे. माझे अशिल विकत घेत असलेल्या क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - देहरंग, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र आर. चौ. मी. चौ. से. मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४/ब/१५ (प्लॉट नं. ५ अ + ५ब) (सब प्लॉट नं. १ ते ५) | ४३.५०.०० | ४३५.०० |

याप्रमाणे वर नमुद मिळकत माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी वर नमुद मिळकतीबाबत झालेल्या व्यवहारांस व मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाही व्यक्तीची/संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा हक्क, पोटगी, लिज, सबलिज, लिएन, सदर मिळकतीतुन जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीविक्रीकरार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल. सही/-
दिनांक :- १५/०६/२०२६ ॲड. ज्ञानेश्वर श्रीनिवास कुळकर्णी
कार्यालयीन पत्ता :- गाळा नं. १२५, पहिला मजला, महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
मोबाईल नं. - ८०९७३९९३३१ ई मेल आय.डी. dsk840@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-पाषाणे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-पॉ. | रूपये | पैसे |
| अशोक राजाराम शेलार मयततर्फे वारस श्री. अमित अशोक शेलार व इतर | १४ | १/ब | ०-६९-०० | ० | ८५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

ॲड. जयेश संभाजी म्हसे
दिनांक :- १५/०६/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत श्री. दत्तात्रेय बाळकृष्ण चव्हाण रा.भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड | ४८ | ०-१७-०० पो.ख. ०-०९-०० एकूण ०-२६-०० | ४.३१ |

सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस, भाडेपट्टा, फरोक्तखत, लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग सही/-
दिनांक : १३/०६/२०२६

(ॲड. वैभव वसंत पाटील)
रा. नवेदर बेली, ता.अलिबाग
जि. रायगड, मो ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ. मीना सुनिल पोफळे, श्री. सुनिल हरिपंत पोकळे यांचे मालकीची, ताबेकब्जा, वहिवाटीची आहे. सदर मिळकत ही आमचे अशिलांना विकण्याची आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे. सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध नाही.

सदर मिळकतीची आम्ही विक्री करत असल्याने सदर व्यवहारास कोणाची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| कोळगाव ता. अलिबाग | ३५७ | ०-५४-०० पो. ख ०-१६-८० एकुण क्षेत्र ०-७०-८० | ०.८२ |
| कोळगाव ता. अलिबाग | ३५६/२ | ०-३१-६० पो. ख ०-०४-४० एकुण क्षेत्र ०-३६-०० | ०.५० |

वर नमुद मिळकती या नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग
दिनांक- १३/०६/२०२६ सही/-

ॲड. पुनम अजित म्हात्रे
जिल्हा न्यायालय - रायगड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेवीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-उक्रुळ, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-पॉ. | रूपये | पैसे |
| अशोक द्वारकानाथ देशमुख | ६४ | १ | १-३२-४० | १९ | ०० |
| | लिहून देणार यांच्या हिश्याचे क्षेत्र हे ० आर ४४ पॉ १३ मात्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

ॲड. जयेश संभाजी म्हसे
दिनांक :- १५/०६/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७

## ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता. माणगाव, जि. रायगड. अल्प मुदतीची जाहीर निविदा सूचना

ग्रा.पं. नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि. १२/०६/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत भाले यांचेकडील ग्रा.पं. फंड अंतर्गत खालील कामांकरीता अधिकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित रक्कम | इसारा फी | निविदा फी | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा उघडणेचा दिनांक | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालय छप्पर दुरूस्ती करणे | ग्रा.पं. फंड | १६००००/- | १६००/- | २००/- | १६/०६/२०२६ | १७/०६/२०२६ | १० दिवस |
| २ | ग्रामपंचायत कार्यालयासाठी रॅम्प बांधणे | दिव्यांग कल्याण (५%) | १००००/- | १००/- | २००/- | १६/०६/२०२६ | १७/०६/२०२६ | १० दिवस |

**अटी व शर्ती :-** १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. १६/०६/२०२६ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/ चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/ पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/ पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा. उपअभियंता (ग्रा.पा.पु/बांध) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा. सरपंच ग्रा.पं. भाले यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगांव जि.रायगड**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगांव जि.रायगड**

# भारताची विजयी सलामी

## || अफगाणला सात गडी राखून नमवले || इशान, राहुलची शानदार भागीदारी

| धर्मशाळा | वृत्तसंस्था |

हिमाचल प्रदेशच्या धर्मशाळा येथे भारत अन् अफगणिस्तामध्ये पहिला एकदिवसीय सामना पार पडला. पाऊस पडल्यामुळे आजचा सामना ५० ऐवजी केवळ २५ ओव्हर्सचा खेळवण्यात आला. भारताने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. दरम्यान रहमनुल्लाहच्या शतकाच्या जोरावर अफगाणिस्तानने भारताला १९५ रन्सचे टार्गेट दिले होते.



शुभमन गिलने शानदार अर्धशतकी खेळत ६६ बॉल्समध्ये ८४ धावा केल्या. अखेर या सामन्यात पुन्हा एकदा शुभमनने आपले वर्चस्व दाखवून दिले आणि एकहाती सामना भारताच्या नावे केला. इशानची शुभमनला चांगली साथ मिळाली. याशिवाय तिसरी विकेट गेल्यानंतर शेवटपर्यंत के एल राहुल मैदानावर टिकून राहिला.

केवळ १९ बॉल्समध्ये राहुलने ३९ धावा केल्या. यामध्ये ३ सिक्स आणि ४ चौकारांचा समावेश आहे.

याआधीही आयपीएलमध्ये धर्मशाळाच्या मैदानावर राहुल धावांच्या रुपाने बरसला आहे आणि आजच्या सामन्यातही त्याने तोच धमाका केला.

अफगणिस्तानने दिलेल्या १९५ रन्सचा पाठलाग करण्यासाठी भारताकडून कर्णधार शुभमन गिल आणि रोहित शर्मा मैदानात उतरले. दोघांनी भारताला सावध पण चांगली सुरुवात करून दिली. शुभमन गिल आक्रमकपणे खेळताना दिसून आला.

रोहित शर्माने या सामन्यात आपले १६ हजार रन्स पूर्ण केले. १६ धावांवर असताना शुभमनच्या एका चुकीमुळे रोहित रन आउट झाला. विशेष म्हणजे, रोहित शर्मा भारतासाठी सलामीवीर म्हणून १६,००० धावा पूर्ण करणारा पहिला फलंदाज ठरला आहे. इशान किशन खेळण्यासाठी आला. कर्णधार शुभमन गिलने शानदार अर्धशतक लगावले.

इशान किशनने देखील आक्रमक खेळी केली. इशान किशन ३४ रन्स करून आउट झाला. श्रेयस अय्यर १२ रन्स करून आउट झाला. यावेळी श्रेयस अय्यरच्या बॅटने कोणतीही जादू दाखवली नाही. संपूर्ण सामना हा एकहाती शुभमनने खेचून आणला.

### रोहितच्या सलामीला १६ हजार धावा

रोहित शर्माने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सलामीला १६ हजार धावांचा ऐतिहासिक टप्पा यादरम्यान पार केला. या यादीत श्रीलंकेचा सनथ जयसूर्या १९,२९८ धावांसह आघाडीवर आहे. रोहितशिवाय सेहवाग देखील (१६,११९) या यादीत समाविष्ट आहे.

## आरडीसीएतर्फे क्रिकेट पंच प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

| अलिबाग | क्रीडा प्रतिनिधी |

RAIGAD DISTRICT CRICKET ASSOCIATION

■ **ऑनलाईन तसेच प्रत्यक्ष कार्यशाळा**

■ **महिला पंचांचा असणार समावेश**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने दिनांक १४ जून ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत रायगड जिल्ह्यातील सर्व क्रिकेट पंचांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरचे प्रशिक्षण शिबीर ऑनलाईन व प्रत्यक्ष कार्यशाळेच्या माध्यमातून घेण्यात येणार असून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पंच परीक्षेसाठीच्या पूर्व तयारी करीत हे प्रशिक्षण शिबिर उपयुक्त ठरणार आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन बरोबर रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने पंच परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत रायगड जिल्ह्यातील २५ पंचांनी त्यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने महिला पंचांचा सुधा समावेश असणार आहे. क्रिकेट पंच प्रशिक्षण शिबिरासाठी मुख्य प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून माजी रणजीपटू व विद्यमान बीसीसीआयचे पंच हर्षद रावले, बीसीसीआयचे पंच रुपेश खडगी, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे पंच राजन कसबे व एमसीसी लॉ तज्ञ नयन कट्टा हे काम पाहणार आहेत.

गेली दोन वर्षे रायगड जिल्ह्यातील क्रिकेट पंचांना हेच प्रशिक्षक बहुमूल्य प्रशिक्षण व मार्गदर्शन करत आहात परिणामी रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पंच दरवर्षी एमसीए पंच परीक्षा उत्तीर्ण होत आहेत. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदीप नाईक यांनी जिल्ह्यातील जास्तीत जास्त क्रिकेट पंचांनी सदरच्या प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. शिबिरामध्ये सहभाग घेण्यासाठी प्रशांत माळी ९८३३०३८९९१ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सिंधूच्या 'गोल्डन' अपेक्षांना खीळ

| नवी दिल्ली | प्रतिनिधी |

पी. व्ही. सिंधू ही भारताची स्टार बॅडमिंटनपटू खेळाडू आहे. दोन वेळेस ऑलिंपिक विजेती पी. व्ही. सिंधूचा ऑस्ट्रेलियन बॅडमिंटन ओपन २०२६ च्या सेमीफायनलमध्ये पराभव झाला आहे. भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूचा पराभव झाला आहे. यामुळे पी. व्ही. सिंधूचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे.ऑस्ट्रेलियन बॅडमिंटन ओपन २०२६ च्या सेमीफायनलमध्ये पी. व्ही. सिंधूचा पराभव झाला आहे. त्यामुळे यंदाच्या हंगामातील पहिल्या जेतेपदाची तिची प्रतीक्षा कायम राहिली आहे. जपानच्या अकाने यामागुचीने पी. व्ही. सिंधूचा पराभव केला आहे.पहिल्या डावात पी. व्ही. सिंधूने यामागूचिला जोरदार टक्कर दिली. अर्धा डाव होईपर्यंत तिने काही पॉईंट्सची आघाडी घेतली. मात्र, त्यानंतर यामागुचीने सलग ६ पॉईंट्स मिळवून शानदार कमबॅक केले. दुसऱ्या गेममध्ये सुरुवातीला चुरस पाहायला मिळाली. त्यानंतर यामागुचीने सात सलग गुण घेत सामन्यावर पूर्ण नियंत्रण मिळवले. सिंधूच्या या पराभवामुळे ऑस्ट्रेलियन ओपनमधील भारताचे आव्हान पूर्णपणे संपुष्टात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिनाचे आयोजन

| मुंबई | प्रतिनिधी |

आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन १५ जून रोजी साजरा करण्यात येणार आहे. मल्लखांब लव संघाचे प्रमुख आशिष देवल व संचिता देवल यांच्या संकल्पनेतून व बीमानगर एज्युकेशन सोसायटी, बोरीवली यांच्या संयुक्त विद्यमाने आणि संजय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी नावीन्यपूर्ण पद्धतीने आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन साजरा करण्यात येणार आहे.




मल्लखांब या महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल मराठमोळ्या खेळाला पाठिंबा देण्यासाठी व खेळाचा अनुभव घेण्यासाठी महाराष्ट्राच्या मनावर अधिराज्य गाजवणारे मराठी कलावंत एकत्रित येणार आहेत.

१५ जून रोजी दुपारी ४ ते रात्री ८ या वेळेमध्ये बीमानगर एज्युकेशन सोसायटी, शांती आश्रम बस डेपो समोर, बोरीवली पश्चिम येथे मल्लखांब कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

मल्लखांब या खेळाला राज्य मान्यता मिळावी व शासकीय पातळीवर सहकार्य मिळावे यासाठी आवाहन या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. राजकीय, सामाजिक, कला, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून सहभागी कलाकारांचा सन्मान व राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव करणार आहेत.

## बांगलादेशी क्रिकेटपटूला मारहाण

**नवी दिल्ली :** बांग्लादेश कसोटी संघाचा फिरकीपटू नईम हसनने चटगाव पोलिसांवर मारहाण आणि शिवीगाळ केल्याचा आरोप केला आहे. २६ वर्षीय क्रिकेटपटू म्हणाला मी अधिकाऱ्यांना मी राष्ट्रीय क्रिकेटपटू असल्याचे सांगितले, पण ते थांबले नाहीत. नईम ढाका प्रीमियर लीगमध्ये प्राइम बँक क्रिकेट क्लबसाठी शेवटचा सामना खेळल्यानंतर १२ जूनच्या रात्री विमानाने चटगावला पोहोचला होता. तो रात्री ११:२५ वाजता ऑटोने घरी परतत असताना, लंकन बाजार उड्डाणपुलाखाली पोलिसांनी त्याचे वाहन थांबवून मारहाण केली.

## विश्वचषकात ऑस्ट्रेलियाची दणदणीत सुरुवात

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

महिला टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेला सुरुवात झाली असून शनिवारी झालेल्या सामन्यात गतविजेत्या ऑस्ट्रेलियाने दमदार विजयाची नोंद केली. मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेचा तब्बल ६५ धावांनी पराभव करत स्पर्धेची शानदार सुरुवात केली. पहिल्याच सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाने आपली ताकद दाखवत प्रतिस्पर्धी संघावर वर्चस्व गाजवले. या सामन्यात नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला काही विकेट्स गमावल्यानंतर मधल्या फळीत आलेल्या फिबी लिचफिल्डने आक्रमक खेळी करत डाव सावरला. तिने केवळ २४ चेंडूत अर्धशतक झळकावत ५० धावांची तडाखेबाज खेळी केली. तिच्याशिवाय अनुभवी एलिस पेरीने ३६ धावांचे योगदान दिले, तर जॉर्जिया वेअरहॅमने ३२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या फलंदाजांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने निर्धारित २० षटकांत ८ बाद १७२ धावांचा मजबूत डोंगर उभा केला. १७३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेची सुरुवात निराशाजनक झाली. सलग विकेट्स पडत असल्याने त्यांना मोठी भागीदारी करता आली नाही. कर्णधार लॉरा ३९ चेंडूत ४४ धावांची झुंजार खेळी केली, मात्र तिला इतर फलंदाजांची अपेक्षित साथ मिळाली नाही. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ १६.४ षटकांत अवघ्या १०७ धावांवर गारद झाला. ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनीही प्रभावी कामगिरी केली. जॉर्जिया वेअरहॅमने ३ विकेट्स घेत दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. तर सोफी मोलिनक्स आणि अलाना किंग यांनी प्रत्येकी दोन-दोन बळी घेत महत्त्वाचे योगदान दिले.





## जिम्नॅस्टिक्समध्ये नारायणराव आचार्य विद्यानिकेतनचे वर्चस्व

| मुंबई | प्रतिनिधी |

क्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्समधील आपले निर्विवाद वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध करत श्री नारायणराव आचार्य विद्यानिकेतन संघाने मुंबई महापौर चषक निमंत्रित क्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धेचे विजेतेपद दिमाखात पटकावले. चेंबूर येथील विद्यानिकेतनच्या मैदानावर रंगलेल्या या स्पर्धेत यजमान संघाच्या खेळाडूंनी अचूकता, समन्वय आणि अप्रतिम कौशल्याचे दर्शन घडवत प्रतिस्पर्ध्यांचा अक्षरशः धुव्वा उडवला. विशेष म्हणजे २००२ ते २०२६ या कालावधीत झालेल्या सर्व स्पर्धांमध्ये श्री नारायणराव आचार्य विद्यानिकेतन संघाने अजिंक्यपदाची परंपरा अखंड राखत सुवर्ण इतिहास कायम ठेवला आहे.

प्रतिष्ठेच्या स्पर्धेत १५ संघांतील २५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. विविध गटांतील चुरशीच्या लढतींनी प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले. अंतिम गुणतालिकेत देव स्पोर्ट्स ॲकॅडमीने उपविजेतेपद पटकावत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली, मात्र विजेतेपदाच्या शर्यतीत विद्यानिकेतनच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच निर्विवाद वर्चस्व राखले.

स्पर्धेचे उद्घाटन लोकमान्य शिक्षण संस्थेचे सचिव माणिक पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ. सना मलिक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र मोहिते, जयप्रकाश अग्रवाल, लोकमान्य शिक्षण संस्थेचे विश्वस्त सुबोध आचार्य, हरिश्चंद्र गवस, हिरा मोराळे, डॉ. महेंद्र चेंबूरकर, सचिव मोहन बामणे आणि आंतरराष्ट्रीय पंच मंदार म्हात्रे यांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन देण्यात आले.

विजेतेपद पटकावणाऱ्या श्री नारायणराव आचार्य विद्यानिकेतन संघातील खेळाडूंनी विविध प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. वुमेन्स पेअर प्रकारात विशाखा दोरगे आणि रूणल रणपिसे या जोडीने प्रभावी सादरीकरण केले.

**सिद्धेश लाडच्या नेतृत्त्वात इतिहास रचला** | **महिलांमध्ये सोबो मुंबई फाल्कन्स विजयी**

## मराठा रॉयल्स सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन

| मुंबई | वृत्तसंस्था |

सिद्धेश लाडच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मराठा रॉयल्सने सलग दुसऱ्यांदा टी-२० मुंबई लीगचं जतेपद जिंकून इतिहास रचला आहे. भारतीय क्रिकेटची पंढरी असलेल्या मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर शनिवारी ३१,८३४ प्रेक्षकांच्या साक्षीने रंगलेल्या चौथ्या हंगामाच्या अंतिम सामन्यात मराठा रॉयल्सनं आर्क अंधेरीवर ८ धावांनी विजय मिळवला. तर महिलांची पहिली टी-२० लीग जिंकण्याचा मान मुंबई फाल्कन्सने मिळवला.



वानखेडे स्टेडियमवर रंगलेल्या टी-२० मुंबई लीग २०२६ च्या अंतिम सामन्यात मुंबई साऊथ सेंट्रल मराठा रॉयल्स संघाने आर्क्स अंधेरीचा ८ धावांनी पराभव करत सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावून इतिहास रचला. कर्णधार सिद्धेश लाडच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या मराठा रॉयल्सने दिलेल्या १५५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना आर्क्स अंधेरीचा संघ २० षटकांत ८ बाद १४६ धावाच करु शकला.

मराठा रॉयल्ससाठी उपांत्य सामन्यापाठोपाठ अंतिम सामन्यातही चिन्मय सुतारनं दमदार खेळी करत ६१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्यानं कर्णधार सिद्धेश लाडसोबत ६५ धावांची भागीदारी करुन संघाला आव्हानात्मक धावसंख्या उभारुन दिली.

अखेरच्या काही षटकांत कर्णधार सिद्धेश लाडला क्षेत्ररक्षण करताना गंभीर दुखापत झालेली असतानाही तो पुन्हा मैदानात उतरला. त्याच्या धावांचे योगदान टीमसाठी फार मौल्यवान ठरले. तसेच या स्पर्धेत सर्वाधिक बळी घेणारा तुषार देशपांडे मराठा रॉयल्सच्या यंदाच्या जेतेपदाचा खरा हिरो ठरला.

मोक्याच्या क्षणी शिवम दुबेला बाद करुन त्याने सामना मराठा रॉयल्सच्या बाजूने झुकवला. त्याच्यासह रोहन राजेने अखेरच्या षटकांत संयमी गोलंदाजी करत आर्क्स अंधेरीला बाजी पलटवण्याची जराही संधी दिली नाही. विजेत्या मराठा रॉयल्सना १.५ कोटी तर उपविजेत्या आर्क्स अंधेरीला ७५ लाखांचे ईनाम देऊन गौरवण्यात आले.

### पहिली महिला लीग

पहिल्यांदाच खेळवली महिला लीग यंदाच्या मोसमात पहिल्यांदाच स्थानिक पातळीवर महिला टी-२० मुंबई लीगही यशस्वीपणे खेळवली गेली. या पहिल्याच महिला टी-२० मुंबई लीगमध्ये सोबो मुंबई फाल्कन्स संघाने आकाश टायगर्स मुंबई वेस्टर्न सबर्बसचा २५ धावांनी पराभव करत पहिल्या महिला टी-२० मुंबई लीगचं विजेतेपद पटकावलं. आकाश टायगर्सच्या सानिकानं २२३ धावांसह स्पर्धेत सर्वाधिक धावा करत ऑरेंज कॅप पटकावली.

## निवडक

### भाविका महिला क्रिकेट संघाची कर्णधार

**धुळे :** दोंडाईचाचे ता. शिंदखेडा आजोळ असलेली महाराष्ट्राची कन्या भाविका अहिरे हिच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला आहे. अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर तिची १९ वर्षांखालील भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे. तिच्या या यशाने आजोळच्या दोंडाईचासह धुळे जिल्हा आणि राज्यात आनंदाचे वातावरण आहे. मूळची नाशिकची असलेल्या भाविकाचा जन्म सुशिक्षित आणि सर्वसाधारण कुटुंबात झाला. तिचे वडील मनोजकुमार अहिरे आणि आई पूनम अहिरे नोकरीनिमित्त नाशिक आणि त्यानंतर २०१३ पासून पुण्यात स्थलांतरित झाले. सध्या ती भोसरी (पुणे) येथे राहत असून, एस.पी. कॉलेजमध्ये वाणिज्य शाखेत शिक्षण घेत आहे. राष्ट्रीय पातळीवर चमकभाविकाने आपल्या वैविध्यपूर्ण फलंदाजीने आणि उत्कृष्ट यष्टिरक्षणाने निवड समितीला नेहमीच प्रभावित केले आहे. यात १५ वर्षांखालील संघ बडोद्याविरुद्ध ११३ धावाआणि पदार्पणाच्या सामन्यात मुंबईविरुद्ध १२९ धावा फटकावून ती चर्चेत आली. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने तिला प्रतिभावान महिला फलंदाज म्हणून गौरविले. १९ वर्षांखालील संघ मेघालयाविरुद्ध पदार्पणातच ११९ धावांची शतकी खेळी केली होती.






### प्रज्ञानंदचे कार्लसनवर पुन्हा वर्चस्व

**ओस्लो :** ओस्लो भारताचा तरुण ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद याने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी रचली. २० वर्षीय प्रज्ञानंदने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसनला त्याच्याच मायभूमीत क्लासिकल गेममध्ये दुसऱ्यांदा पराभवाचा धक्का दिला. या खळबळजनक विजयामुळे प्रज्ञानंदचे या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत पहिले भारतीय जेतेपद मिळवण्याचे स्वप्न टिकून आहे. दुसरीकडे जागतिक विजेता डी. गुकेश याला आठव्या फेरीत फ्रान्सच्या अलिरेझा फिरोज्जाकडून पराभवाचा सामना करावा लागल्याने त्याचे जेतेपदाचे आव्हान संपुष्टात आले आहे. गुकेश २०२४ च्या जागतिक जेतेपदानंतर खराब फॉर्मात असून तो केवळ ८ गुणांसह गुणतालिकेत सर्वात तळाला आहे. या प्रतिष्ठित डबल राउंड रॉबिन स्पर्धेत प्रज्ञानंदने या वर्षात कार्लसनला क्लासिकल गेममध्ये दोनदा पराभूत करणारा एकमेव खेळाडू बनण्याचा बहुमान मिळवला आहे. स्पर्धा संपायला दोन फेऱ्या बाकी असताना या विजयामुळे प्रज्ञानंद १२ गुणांसह तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. अलिरेझा १३ गुणांसह दुसऱ्या स्थानावर असून अमेरिकेचा वेस्ली सो १४ गुणांसह अव्वल स्थानावर आहे.



### स्कॉटलंडन संघाने रचला इतिहास

**मँचेस्टर :** आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ च्या दुसऱ्या दिवशी एक मोठा धक्कादायक निकाल लागला. शनिवारी, १३ जून रोजी मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड इथे झालेल्या सामन्यात स्कॉटलंड महिला क्रिकेट संघाने ऐतिहासिक विजय मिळवला. आयर्लंडला ४० धावांनी पराभूत करुन स्कॉटलंडने टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील आपला पहिला विजय नोंदवला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंड महिला संघाने निर्धारित १६१ धावा केल्या. प्रत्युत्तरात, आयर्लंड महिला संघ १९.१ षटकांत १२१ धावांवर गारद झाला आणि त्यांनी इतिहास रचला. स्कॉटलंडने महिला टी-२० विश्वचषकाची सुरुवात दणक्यात केली. आयर्लंडविरुद्धच्या या ऐतिहासिक विजयात दोन बहिणींनी संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. कर्णधार कॅथरीन ब्राइसने ३९ चेंडूमध्ये ६० धावा केल्या. तिची बहीण सारा ब्राइसनंही ३५ चेंडूमध्ये ४९ धावांचं योगदान दिले. दोघांनी मिळून ६४ चेंडूमध्ये १०६ धावांची मौल्यवान खेळी करुन संघाची धावसंख्या १६१ पर्यंत पोहोचवली. यानंतर कर्णधार कॅथरीन ब्राइसने फलंदाजीनंतर गोलंदाजीतही उत्कृष्ट कामगिरी केली. तिने ३.१ षटकांत १९ धावा देऊन २ बळी घेतले.



### वेस्ट इंडिजचा कीवींविरुद्ध विजयी

**साउथम्प्टन :** गतविजेत्या न्यूझीलंडला महिला टी-२० विश्वचषक २०२६ च्या सलामीच्या सामन्यात पराभवाला सामोरे जावं लागले. वेस्ट इंडिज महिला क्रिकेट संघाने न्यूझीलंडचा सात गडी राखून पराभव केला. रोझ बाऊल इथे झालेल्या स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडनं सहा गडी गमावून १६२ धावा केल्या. वेस्ट इंडिजने शेवटच्या षटकात तीन गडी गमावून लक्ष्य गाठले. वेस्ट इंडिजच्या विजयात शेमेन कॅम्पबेलने महत्त्वाची भूमिका बजावली. या अनुभवी फलंदाजाचा हा तिच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील १५४वा सामना आणि १२२वा डाव होता. या सामन्यात तिनं तिच्या कारकिर्दीतील पहिलं अर्धशतक झळकावले. सर्वाधिक डाव खेळून अर्धशतक झळकावणारी कॅम्पबेल पहिली महिला क्रिकेटपटू ठरली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)